# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- १०** **// विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.०५/०३/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०५/०३/२०१९ मंगळवार रोजी दुपारी ०२.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | कापसे मयुर चंद्रकांत | सोनार रंजना विजय |
| जोहरे प्रिया मधुकर | कापसे प्रतिभा चंद्रकांत | खडके सुनिल वामनराव |
| नेरकर सरिता अनंत | देशमुख प्रतिभा गजानन | खडके विश्वनाथ सुरेश |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील विजय पुडलिक | भंगाळे विष्णु रामदास |
| खान रुकसानाबी गबलु | सोनवणे सुरेश माणिक | सोनवणे राखी शामकांत |
| सोनवणे कांचन विकास | बारी शोभा दिनकर | लढ्ढा नितीन बालमुकुंद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख हसीनाबी शरीफ | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील कुलभुषण विरभान | महाजन सुनिल सुपडू |
| सपकाळे मिना धुडकु | भिल पार्वताबाई दामु | नाईक प्रशांत सुरेश |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | पटेल इब्राहिम मुसा |
| सपकाळे रंजना भरत | कोल्हे सिंधु विजय | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| सनकत चेतन गणेश | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे भारती कैलास | राणे गायत्री इंद्रजित | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| चौधरी चेतना किशोर | तायडे सुरेखा नितीन | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे अमित पांडुरंग | चव्हाण ज्योती बाळासाहेब | शेख सैईदा युसुफ |
| चौधरी मंगला संजय | मराठे जितेंद्र भगवान | **स्विकृत सदस्य** |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | सोनवणे कैलास नारायण |
| सोनवणे धिरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| काळे दिपमाला मनोज | पाटील राजेंद्र झिपरु | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | काळे रेश्मा कुंदन | चौधरी महेश रतन |
| पाटील प्रतिभा सुधीर | आहुजा मनोज नारायणदास | |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील मिनाक्षी गोकुळ | |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**(वंदेमातरमने सभेची सुरुवात झाली.)**

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, सौ.जयश्री सुनिल महाजन, शेख शबानाबी सादीक खाटीक, श्रीमती लताबाई रणजीत भोईटे, श्री.भगत रावलमल बालाणी, श्री.सदाशिव गणपत ढेकळे, श्री.किशोर रमेश बाविस्कर,श्री.ललित विजयराव कोल्हे, श्री.प्रवीण रामदास कोल्हे, श्री.बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

श्री.दिलीप पोकळे :- शिवाजी नगर पुला संदर्भात पर्यायी व्यवस्था करणेसाठी नवनाथभाऊ आणि मी महासभेमध्ये चार ते पाच वेळा विषय उपस्थित केला. परंतु कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता पुल पाडण्यात आला. सदर ठिकाणी दोन दोन

तीन तीन तास ट्रॉफिक जाम होतो. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होते. वाहतुकीचा विषय आहे. रुग्णवाहिकेचा विषय आहे तसेच अंतयात्रा इत्यादीसाठी नागरीकांचे हाल होतात.

श्री.नवनाथ दारकुंडे :- झोपड्या जळाल्या तर यास कोण जबाबदार तसेच शिवाजी नगर परिसरातील नागरीकांकरिता पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी. व पर्यायी व्यवस्था कशी राहणार आहे याचा खुलासा करावा.

श्री.सुनिल भोळे :- लेंडी नाल्यावरिल पुलाचे काम सुरु आहे. कॉंक्रीटींगचे ही काम सुरु आहे. दिड महिन्यात काम पुर्ण होईल. पर्यायी मार्ग ममुराबाद आसोदा रस्ता तयार आहे. तेथुन वाहतुक सुरु आहे. रेल्वेने दिलेल्या वेळेत काम पुर्ण होईल.

श्री.नवनाथ दारकुंडे :- आम्ही आपणास सुचविले होते परंतू आपण आमचे ऐकत नव्हते. त्या आगोदर पर्यायी रस्ता का केला नाही. आम्ही सुचविले तुम्ही खोटे बोलत आहात. तुम्ही आम्हाला सांगितलं की, आपल्या हद्दीत तो रस्ता येत नाही. पर्यायी जो आसोदा रोड आहे त्यावर खुप खड्डे आहेत.

श्री.नवनाथ दारकुंडे :- पर्यायी रस्ता खडीचा आहे. त्यावर मुरुम टाकावे.

श्री. दिलीप पोकळे:- शिवाजीनगर, गणेश कॉलनी सर्व परिसरात खड्डे आहेत. दोन दोन तास ट्रॅफिक मध्ये जातात. इमर्जन्सी पेशंटसाठी पर्यायी रस्त्याची व्यवस्था नाही. अशा लोकांचे जिवाशी खेळण्याचा हा विषय आहे. त्याची जबाबदारी कोण घेणार. हा जनतेच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. तरी सर्व सभागृहाला विनंती आहे की, पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी.

श्री.नवनाथ दारकुंडे :- लवकरात लवकर रस्त्यावर मुरुम टाकुन पिचींग करण्यात यावा.

श्री.नितीन लढ्ढा :- कुठे तरी हा निर्णय अविवेकीपणाने झालेला दिसतो. कारण लेंडी नाल्याचा पुल ३ महिन्यापुर्वी तोडण्यात आलेला होता. पुल नंतर करण्यात आला पाहिजे होता. लेंडी नाल्याचा पर्यायी व्यवस्था सुध्दा केलेली नव्हती. तसेच पुलाची मुदत संपून ७ वर्ष झालेली आहेत व आता आचारसंहिता लागेल त्यामुळे हे काम सुध्दा अपुर्ण राहील. २ - ३ महिने वाट बघीतली असती तर लेंडी नाल्याच्या पुलाचे काम सुध्दा पुर्ण झाले असते तर बराच दिलासा मिळाला असता परंतू यात राज्यात व केंद्रात एकाच पक्षाची सत्ता असतांना समन्वयाचा अभ्यास दिसतो. सदर निर्णय अविवेकीपणाचा झालेला दिसतो. हुकूमशाहीप्रमाणे अविवेकी निर्णय घेतला आहे. आगी संदर्भात आता जी परिस्थिती निर्माण झाली ते झाले नसते कारण परवा त्या ठिकाणी झोपडया जळाल्या तिथे अग्नीशमन बंब आगीच्या ठिकाणी पोहचण्यापुर्वी त्याठिकाणी झोपडया उध्वस्त झाल्या. विकासाचे धोरण ठरवतांना स्थानिक अडचण काय निर्माण होतात. या सगळया गोष्टींचा समन्वय होणे आवश्यक आहे.

श्री.कैलास सोनवणे :- या विषयाला मा.श्री.गिरीषभाऊ हे स्वत: रेल्वेचे डि.आर.एम.यांचेशी बोलले होते त्यावेळेस ते म्हणाले होते की, हा पुल केव्हा पडेल हे सांगता येत नाही आणि यामुळे खुप मोठी हानी होणार आहे. म्हणुन त्या पुलाला पाडावा लागला. लेंडी नाला पुलाचे काम हे आगोदर रेल्वेकडुन सुरु आहे. भविष्यात दुर्देवी घटना घडाल्या असत्या म्हणुन हे करण्यात आले हे कोणी जाणुन बुजुन केलेले नाही. लोकांचा जीव वाचावा यासाठी केलेले आहे तसेच पर्यायी मार्गासंदर्भात सुध्दा बोलने झालेले आहे. कोणी हुकुमशाही पध्दतीने हे केलेले नाही. लोकांचे जीव वाचावे या उद्देशाने पुल पाडण्यात आलेला आहे.

श्री. कुलभुषण पाटील :- मा.आयुक्त सो., मी आपणाकडेस दि.०७/०२/२०१९ चे पत्र दिले होते. तसेच सभागृहातील सन्मा.सदस्या सौ.पार्वताबाई भिल यांनी सुध्दा पत्र दिलेले होते. भिल समाजासाठी आपल्या महानगरपालिका अखत्यारीतली स्मशानभुमीसाठी त्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी. मात्र त्या ठिकाणी दफनविधीसाठी इंचभर सुध्दा जागा शिल्लक राहीलेली नाही. तरी याबाबत लवकरच निर्णय व्हावा ही विनंती.

श्री.नितीन लढ्ढा :- अजेंडयावर जे विषय आहेत त्यावरच चर्चा करावी.

श्री.कैलास सोनवणे :- काही दिवसांपुर्वी दैनिक सकाळ वृत्तपत्राचे माध्यमाने जळगांव शहर महानगरपालिका नवनिर्वाचित सदस्यांकरिता प्रशिक्षण आयोजित केले होते त्याचप्रमाणे आचारसंहिता संपलेवर सन्मा.सदस्यांकरिता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे.

नगरसचिव विषय क्र.१) व.वा.मार्केट मधील तिसरा मजला हॉल बी-१ व डी-१ हॉल विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) यांना महानगरपालिकेच्या विहीत अटी व शर्तीनुसार भाडे तत्वाने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदया, अश्याच प्रकारे ज्या मनपाच्या मिळकती वर्षानुवर्षापासुन खाली असतील त्यांचे बाबतीत सुध्दा भाडे तत्वावर देणेबाबत निर्णय घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) यांनी अर्ज केलेला असुन सदर अर्जात कार्यालयीन आदेश क्र.२०१९/सीआर-०१/एडीएम-०१/१८७ नुसार महाउर्जा चे कार्यालय जळगांव येथे सुरु करणेकरीता महानगरपालिकेच्या मालकीची १००० ते १५०० चौ.फुट क्षेत्रफळाचा इमारत / गाळा उपलब्ध करुन द्यावा सदरबाबतचे भाडे शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल असे पत्रात नमुद आहे त्यानुसार मार्केट वसुली विभागाकडील रिक्त हॉल ची यादी रेडीरेकनर प्रमाणे भाडे ठरवुन मिळणे कामी नगररचना विभागाकडेस प्रकरण पाठविण्यात आले व नगररचना विभाग यांनी पुढील प्रमाणे भाडेदर ठरवुन दिले.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | मजला | गाळा क्रमांक | क्षेत्रफळ (चौ.मी.) | वार्षिक भाडे | मासिक भाडे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व.वा.मार्केट | तिसरा | बी-१ | १०२.५३ | ४८९७९८ | ४०८१७ |
| २ | व.वा.मार्केट | चौथा | डी-१ | १९८.८४० | ९४९८५८ | ७९१५५ |

प्रस्तावीत केलेल्या भाडेनुसार महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) यांना म.न.पा.च्या अटी शर्तीनुसार गाळा देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- तायडे सुरेखा नितीन**

नगरसचिव विषय क्र.२) सि.स.क्र.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा. ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदरचा विषय हा अनिश्चित काळासाठी तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- खान रुकसानाबी गबलू**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

नगरसचिव विषय क्र.३) १) श्री. अनिल मन्साराम पाटील २) श्री.दिनकर लक्ष्मण कुरकुरे यांनी भरलेली रेन वॉटर हार्वेस्टींग व वृक्ष अनामत रक्कम परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, १) श्री. अनिल मन्साराम पाटील यांनी स.नं.५२/१ब प्लॉट नं.०१ जळगांव शिवार या ठिकाणी बांधकाम करणे कामी बांधकाम परवानगी क्र.१५५२ दि.२८/०३/२०१२ घेतलेली असुन सदर बांधकाम परवानगी घेतांना त्यांनी बांधकाम परवानगी मंजुर करते वेळी रेन वॉटर हार्वेस्टींग कामी रक्कम रु.५०००/- व वृक्ष अनामत कामी रक्कम रु.२०००/- या प्रमाणे एकुण रक्कम रु.७०००/- मात्र पावती क्र.१४०४१ दि.२२/०३/२०१२ अन्वये म.न.पा. खजिन्यात भरणा केलेला आहे. सदर अर्जदार यांनी बांधकाम पुर्ण झाल्याने भोगवटा प्रमाणपत्र क्र./नर/००१६ दि.१७/०७/२०१४ अन्वये घेतलेले आहे. अर्जदार यांनी बांधकाम परवानगी घेतांना भरलेली रेन वॉटर हार्वेस्टींग व वृक्ष अनामत रक्कम परत मिळणे कामी अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

२) श्री.दिनकर लक्ष्मण कुरकुरे स.नं.५२/१ब प्लॉट नं.०२ जळगांव शिवार या ठिकाणी बांधकाम करणे कामी बांधकाम परवानगी क्र.१५५१ दि.२८/०३/२०१२ घेतलेली असुन सदर बांधकाम परवानगी घेतांना त्यांनी बांधकाम परवानगी मंजुर करते वेळी रेन वॉटर हार्वेस्टींग कामी रक्कम रु.५०००/- व वृक्षय अनामत कामी रक्कम रु.२०००/- या प्रमाणे एकुण

रक्कम रु.७०००/- मात्र पावती क्र.१४०४२ दि.२२/०३/२०१२ अन्वये म.न.पा. खजिन्यात भरणा केलेला आहे. सदर अर्जदार यांनी बांधकाम पुर्ण झाल्याने भोगवटा प्रमाणपत्र क्र./नर/००१५ दि.१७/०७/२०१४ अन्वये घेतलेले आहे. अर्जदार यांनी बांधकाम परवानगी घेतांना भरलेली रेन वॉटर हार्वेस्टींग व वृक्ष अनामत रक्कम परत मिळणे कामी अर्जाव्दारे विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने अर्जदार यांनी भरलेली अनामत रक्कम परत करणे कामी महासभा ठराव क्र.७७७ दि.२४/०९/२०१० अन्वये वृक्ष लावगवडी साठी घेतलेली अनामत ही झाडे लावल्या पासुन ५ वर्ष झाल्यानंतर अनामत रक्कम परत करणे बाबत ठरावामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. सदर ठरावान्वये अर्जदार यांनी रेन वॉटर हार्वेस्टींग व वृक्ष लागवड केली असल्याबाबत शहर अभियंता यांनी दिलेल्या अभिप्राय व त्या बाबतचे छायाचित्र देखील अर्जदार यांनी सादर केलेले असल्याने व अर्जदार यांच्या अनामत रक्कमेस ३ वर्षापेक्षा अधिक कलावधी झालेला असल्याने १) श्री. अनिल मन्साराम पाटील, यांची अनामत रक्कम रु.७०००/- व २) श्री.दिनकर लक्ष्मण कुरकुरे यांनी भरलेली रेन वॉटर हार्वेस्टींग व वृक्ष अनामत रक्कम रु.७०००/- परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- तायडे सुरेखा नितीन**

नगरसचिव विषय क्र.४) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१० 'कम्पोस्ड डेपो' (Composed Depot) मौजे जळगांव शिवार स.नं.३९०/१/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- TDR देण्याची त्यांना ऑफर करावी परंतु जमीन मालक TDR घेण्यास नाकारतील तर काही आरक्षण व्यपगत होऊन जातील. काहींनी TDR नाकारलेला आहे. म्हणुन मी मागील महासभेला सांगत होतो. या संदर्भात भुसंपादन करणे कामी राज्य शासनाकडुन अनुदान मागणी बाबत ठराव करावा. भविष्यात विकास होणार नाही. तसेच उत्पन्न वाढविणेसाठी प्रयत्न करावे. विकास आराखडा तयार करतांना लागणारे उदयाने, प्लेग्राऊंड, बाजार हे प्रस्तावित केलेले असतांत. आपली आर्थिक परिस्थिती नाही म्हणुन गांर्भिय जाणुन घेत नाही. असेच जर असले तर पुढे कंपाऊंडलाही जागा दिसणार नाही. पुढे फक्त इमारतीचेच शहर राहील. पर्यायी जागा दिसणार नाही. शहराची स्थिती बिघडेल त्या करिता TDR ऑफर करावा. आरक्षण मोडणे हे संयुक्तीक होणार नाही. याबाबत गांभिर्याने विचार करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१० 'कम्पोस्ड डेपो' (Composed Depot) अंतर्गत मौजे मौजे जळगांव शिवार स.नं.३९०/१/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.वसंत गोविंद खडके यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.वसंत गोविंद खडके यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंग**

नगरसचिव विषय क्र.५) जळगांव नगररचना योजना क्र.३, अंतिम भुखंड क्र.४३५ चे क्षेत्र कलम ९१ अन्वये दुरुस्त होणेबाबत श्री.सतिष सोमा भोळे यांचा दि.१०/०२/२०१५ रोजीच्या अर्जाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.सतिष सोमा भोळे यांनी नगर योजना जळगांव मधील अंतिम भुखंड क्र.४३५ चे वहीवाटी नुसार क्षेत्राप्रमाणे दुरुस्ती करणे बाबत मनपास विनंती केली होती. त्या अनुषंगाने मनपाने पत्र क्र./नर/२२१९/ दि.११/११/२०१६ अन्वये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ९१ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला होता. त्यानुसार शासनाने पत्र क्र.टी.पी.एस.३५१६/१९१/प्र.क्र./४०६/२०१७/नवि-०९ दि.२३/०२/२०१७ अन्वये जळगांव मनपाने पडताळणी करुन महासभेच्या ठरावासह प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत कळविले आहे.

नगररचना योजना क्र.०३ ही शासनाने दि.२९/०५/१९९३ च्या निर्णयाव्दारे मंजुर केली असुन सदरची नगररचना योजना दि.२२/०७/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. या मुळ मंजुर नगररचना योजनेप्रमाणे अर्जदाराने जमिनीला मुळ भुखंड क्र.४६७ (क्षेत्र ५९०.५० चौ.मी.) होता व त्यास अंतिम भुखंड क्र.४३५ (क्षेत्र ६०३.७५ चौ.मी.) देण्यात आला होता.

अर्जदारांनी त्यांच्या अंतिम भुखंडाची वहिवाटी प्रमाणे मोजणी केली असता (मो.र.नं.३/२०१२ दि.१३/१२/२०१२) वहीवाटी नुसार अंतिम भुखंड क्र.४३५ चे क्षेत्र ६८२.५० चौ.मी. एवढे क्षेत्र असल्याने त्यांनी सदर अंतिम भुखंडाचे क्षेत्रात दुरुस्ती करणेबाबत विनंती केलेली आहे. मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता अ.भु.क्र.४३६ व ४३७ च्या बाजुने वहिवाटीत त्यांचे क्षेत्र दिसुन आलेले आहे. त्याचप्रमाणे रस्त्यामध्ये सुध्दा त्यांचे वहिवाटीतील क्षेत्र दिसुन आलेले आहे. अर्जदाराचे म्हणणे आहे की, सदर अंतिम भुखंडाचा गेल्या ६० ते ७० वर्षापासुन कुंपण आहे. त्यामुळे वहिवाटी प्रमाणे क्षेत्र आहे. सदर मोजणीच्या वेळी अंतिम भुखंड क्र.४३६ च्या जमिन मालकांना हरकत घेतल्याचे दिसुन येत नाही व जागेवर वहिवाटीचे क्षेत्रपुळ कुंपण असल्याने सदरचे क्षेत्र विचारात घेण्यास हरकत नाही, तथापी रस्त्या मधील वहिवाटीचे क्षेत्र मान्य करु नये असे मत आहे, साधारणपणे रस्त्यामधील क्षेत्र १५.०० चौ.मी. एवढे येते. त्यामुळे पुर्व व उत्तर बाजुकडील वहीवाटीचे क्षेत्र विचारात घेता, अ.भु.क्र.चे क्षेत्र ६६७.५० चौ.मी.एवढे येते. त्यानुसार म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ९१ प्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**
**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजित**

नगरसचिव विषय क्र.६) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना(वाढीव हद्द) मध्ये मौजे जळगांव स.नं.३५१/२अ/३ या जमिनीतुन जाणाऱ्या २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये मौजे जळगांव स.नं.३५१/२अ/३ या जमिनीतुन जाणाऱ्या २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंग**

नगरसचिव विषय क्र.७) जळगांव शहराचा मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, प्राथमिक शाळा व क्रिडांगण अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ पैकी या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराचा मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, प्राथमिक शाळा व क्रिडांगण अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ पैकी या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.रविंद्र मधुकर घुगे व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.रविंद्र मधुकर घुगे व इतर यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंग**

नगरसचिव विषय क्र.८) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना मध्ये आरक्षण क्र.११६ बगिचा अंतर्गत मौजे पिंप्राळा शिवार गट नं.१२५ या जमिनीपैकी बाधीत जमीनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना मध्ये आरक्षण क्र.११६ बगिचा अंतर्गत मौजे पिंप्राळा शिवार गट नं.१२५ या जमिनीपैकी बाधीत जमीनीचे भुसंपादनासंबंधी म.प्रा.व न.र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.ठाणसिंग ओंकार पाटील व श्री.दिवाणसिंग ओंकार पाटील यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.ठाणसिंग ओंकार पाटील व श्री.दिवाणसिंग ओंकार पाटील यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंग**

नगरसचिव विषय क्र.९) आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हीसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार पराग कन्स्ट्रक्शन, जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हीसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार पराग कन्स्ट्रक्शन, जळगांव यांनी निविदा सादर करतेवेळी पावती क्र.१५८८१ ते १५८८५ दि.१३/०३/२०१५ अन्वये रक्म रु.६४५०/- इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात भरलेली आहे.

सदर कामी मक्तेदार यांचे निविदा दर जास्त आल्याने त्यांना कामाचा कार्यादेश देण्यात आला नसल्याने व सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार पराग कन्स्ट्रक्शन, जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**
**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

नगरसचिव विषय क्र.१०) आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१३ श्रीरत्न कॉलनी व विधा नगर येथे पीव्हिसी पाईप लाईन टाकणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये १८५०/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत वा.क्र.१३ श्रीरत्न कॉलनी व विधा नगर येथे पीव्हिसी पाईप लाईन टाकणे कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन,जळगांव यांनी निविदा सादर करतेवेळी पावती क्र.६१६३३ दि.१२/०२/२०१६ अन्वये रक्म रु.१८५०/- इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात भरलेली आहे.

सदर कामी मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.०२/१०/२०१४ रोजी पुर्ण करुन दिलेले असल्याने व सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार प्रणव कन्स्ट्रक्शन,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये १८५०/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**
**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

नगरसचिव विषय क्र.११) आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हिसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार श्री.अनिल बारसु भोळे,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हिसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार श्री.अनिल बारसु भोळे,जळगांव यांनी निविदा सादर करतेवेळी पावती क्र.१५८८६ दि.१३/०३/२०१५ अन्वये रक्म रु.६४५०/- इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात भरलेली आहे.

सदर कामी मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेल्या मुदतीत दि.०२/०७/२०१५ रोजी पुर्ण करुन दिलेले असल्याने व सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार श्री.अनिल बारसु भोळे,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**
**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

नगरसचिव विषय क्र.१२) आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हिसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार श्री.सुनिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आमदार स्थानिक निधी अंतर्गत अ.नं.१ १६० मीमी पीव्हिसी पाईप लाईन टाकणे व तसेच इतर ४ कामाचे निविदा भरतेवेळी मक्तेदार श्री.सुनिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांनी निविदा सादर करतेवेळी पावती क्र.१५८७६ ते १५८८० दि.१३/०३/२०१५ अन्वये रक्म रु.६४५०/- इसारा अनामत म्हणुन मनपा अर्थ विभागात भरलेली आहे.

सदर कामी मक्तेदार यांचे निविदा दर जास्त आल्याने त्यांना कामाचा कार्यादेश दिलेला नसल्याने व सदरचे काम पुर्ण होवून ४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार श्री.सुनिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांनी भरलेली इसारा अनामत रक्कम रुपये ६४५०/- मात्र परत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**
**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

नगरसचिव विषय क्र.१३) अमृत अभियानांतर्गत हरीत क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत बगीचे विकसीत करणेचे कामे सुरु असुन त्या जागेवर कंपाऊंड वॉल (चेनलिंक फेन्सींग) बोअरवेल करणेचे कामी रक्कम रु.१,४४,०४,४४५/- मात्रच्या खर्चास १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन खर्च करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका हद्दीत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकूण २६ हरीत क्षेत्रांना शासनाकडून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेने एकूण २६ ठिकाणी हरीत क्षेत्रांचा विकास करण्यासाठी निविदा प्रस्तावना अंतिम केलेली आहे. शासन परीपत्रक क्र.अमृत-२०१६/प्रकरण क्र.१४६/नवि-३३ दि.१८/०४/२०१६ व दि.२२/०३/२०१७ अन्वये अभियान शहरांमधील हरीत आच्छादनाचे १५ टक्के इतके उद्दीष्ट साध्य करणे, अमृत अनिवार्य सुधारणा अंतर्गत अनिवार्य आहे.

अमृत हरीत क्षेत्र अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी उपरोक्त शासन परीपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार ५० टक्के खर्च वृक्ष लागवडीवर, ३० टक्के खर्च छोटया झाडांवर, आणि उर्वरीत २० टक्के खर्च सिव्हील कामांसाठी नियोजीत आहे. सदरच्या जागांपैकी काही जागांना संरक्षण भिंत उपलब्ध असून उर्वरीत जागांना संरक्षण भिंत बांधकाम करणे आवश्यक आहे. अमृत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार झाडे जिवंत राहण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के असणे, प्रकल्प देखभाल दुरुस्तीसाठी यंत्रणा उभारणेची आवश्यक व्यवस्था महानगरपालिकेने करण्याच्या सुचना आहेत.

सदर मंजुर १ ते २६ कामे परिशिष्ट “अ” मध्ये नमुद करण्यात आली आहे व सदर कामांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कामांपैकी खालील कामां ठिकाणी संरक्षण भिंत, पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था १४ वा वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून करावयाची आहेत.

१४ वा वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून करावयाचे काम खालील प्रमाणे,

| अ.क्र. | सन | कामाचे नांव | बोअरींग | चेनलिंक फेन्सींग | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१७-२०१८ | प्रभाग क्र.८ निमखेडी गट नं.११२ ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे | ९९८२१.०० | ८९१८७१.०० | ९९१६९२.०० |
| २ | २०१५-२०१६ | मेहरुण स.नं.४६४/४ब-५-अ, ४६४/५ खुली जागा येथे पाणी व्यवस्थेकरीता बोअरींग व पाण्याची टाकी उभारणे | ९९८२१.०० | ८९१३५७.०० | ९९११७८.०० |
| ३ | २०१७-२०१८ | प्र.क्र.११ अंतर्गत पिंप्राळा ग.नं.६१/१/अ+६१/२+३ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग व बोअरींग करणे | ९९८२१.०० | २१०२४००.०० | २२०२२२१.०० |
| ४ | २०१७-२०१८ | प्र.क्र. अंतर्गत पिंप्राळा ग.नं.१४५, १४३, १५१/१ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग व | ९९८२१.०० | २५१३६२५.०० | २६१३४४६.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बोअरींग करणे | | | |
| ५ | २०१७-२०१८ | जळगांव शिवार स.नं.२८०, ग.नं.६९ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग व बोअरींग करणे | ९९८२१.०० | १५८४०००.०० | १६८३८२१.०० |
| ६ | २०१७-२०१८ | जळगांव स.नं.६९/१ खुली जागा ज्ञानदेव नगरच्या (१०० फु.) मागील बाजूस चेनलिंक फेन्सींग व बोअरींग करणे | ९९८२१.०० | १२०३५५२.०० | १३०३३७३.०० |
| ७ | २०१७-२०१८ | जळगांव शहर स.नं.९१ खुली जागा, खेडी रोड येथे चेनलिंक फेन्सींग व बोअरींग करणे. | ९९८२१.०० | १६८५३७६.०० | १७८५१९७.०० |
| ८ | २०१७-२०१८ | गट नं.१२८, गट नं.१२९/२+३, ग.नं.१३०/१ खेडी शिवार खुली जागा हॉटेल जान्हवीच्या बाजूस चेनलिंक फेन्सींग व बोअरींग करणे. | ९९८२१.०० | २७३३६९६.०० | २८३३५१७.०० |
| | | | | एकुण रुपये | १४४०४४४५.०० |

उपरोक्त व्यवस्था करण्याबाबत प्रशासनाने १४ वा वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून प्रस्तावीत कामासाठी येणारा खर्च रक्कम रु. १,४४,०४,४४५/- मात्र चे खर्चास मनपा लेखा संहिता १९७१ चे कलम १६० नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- मराठे जितेंद्र भगवान**
**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

नगरसचिव विषय क्र.१४) दिव्यांग हक्क कायदा अमंलबजावणी होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नवनाथ दारकुंडे :- अधिनियम २०१६ मध्ये अपंगांना ज्या सुविधा देणे आवश्यक आहे. त्या देण्यात याव्या. जसे घरकुल वगैरे तसेच अनुदान येवुन सुध्दा खर्च होत नाही. १५ अंधबांधवांना शिवाजी नगर घरकुलांमध्ये बेकायदेशीर घरे हडप केलेले आहे ते खाली करुन घरकुले प्रदान करण्यात यावीत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाचा नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती यहक्क अधिनियम – २०१६ दि.२७/१२/२०१६ पासुन संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यात आला असुन सदर अधिनियमातील तरतूदी नुसार शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.५२/१८/नवि-२८ दि.१० मे २०१८ अन्वये महापालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीच्या अपंग कल्याण व पुनर्वसनासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवणेबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय नगर विकास क्र.संकिर्ण – २०१५/प्र.क्र.११८/नवि-२०, दि.२८/१०/२०१५ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील अपंग कल्याणासाठी १ ते १८ प्रकारच्या प्रयोजनार्थ खर्च करण्याबाबत मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार आयुक्त यांचे कार्यालयात दि.१६/०२/२०१९ रोजी विविध दिव्यांग संघटनेचे प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार मनपा दिव्यांग कक्ष सुरु करणे, शहरातील दिव्यांग व्यक्तींना योजनांची माहिती लाऊड स्पिकर व माहिती फलक लावुन योजनेचा प्रसार करणे, मनपाचे विविध कामांचे मक्ते देताना दिव्यांग व्यक्ती व संस्थांना प्राधान्य देणे, शहरातील दिव्यांग हॉकर्स यांना जागा व दैनिक वसुली करात सुट देणे इत्यादी तसेच शासन निर्णयानुसार ५ टक्के निधीतुन दिव्यांगांसाठी प्रशासनाने प्रस्तावीत केल्या प्रमाणे सोयी-सुविधा पुरविणेस तसेच १५ प्रज्ञाचक्षु उपोषणार्थी यांना मनपा घरकुल योजने अंतर्गत प्राधान्याने घरकुल देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवान**

नगरसचिव विषय क्र.१५) आझाद नगर पिंप्राळा येथील गट नं.२१४/४ खुली जागा (ओपन स्पेस) सामाजिक संस्था गुलशने रजा मल्टीपर्पज फॉऊंडेशनला सामाजिक, शैक्षणिक, वैदयकिय कामासाठी मिळणेबाबत अध्यक्ष, गुलशने रजा मल्टीपर्पज फॉऊंडेशन, आजाद नगर पिंप्राळा जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

श्री.कैलास सोनवणे :- मागच्या विषयाबाबत बोलायचे आहे. मागील सभेत त्यांचेशी बोलणे झाले होते. २७६ घरकुलांमधुन १५ घरकुले अंधबांधवांना देण्यात यावी. उर्वरीत २६१ घरांची ड्रा काढावेत व नंतर जे घर राहतील ते उर्वरीत लोकांना द्यावे. तसेच १५ अनधिकृत घरकुल धारकांवर कार्यवाही करुन ती काढुन घ्यावे.

श्री.सुनिल भोळे :- ३२८ घरकुले बांधले आहेत. त्यापैकी २५२ वाटप केलेले आहे. ७६ घरकुले वाटप करायची बाकी आहे. त्याचे लाभार्थी ठरलेले आहेत. त्याची यादी शासनाकडे गेली आहे. १५ घरकुल धारकांना सदर योजने अंतर्गत घरकुले द्यावयाची झाल्यास त्यासाठी शासनाकडुन मान्यता घ्यावी लागेल त्या शिवाय घरकुल देता येणार नाही.

श्री.सुरेश सोनवणे :- सन्मा. महापौर सो., ५-६ वर्षापहिले मागील योजनेतील ७०० घरकुले होती. बऱ्याच लोकांनी घरकुले बेकायदेशीर विकुन टाकली अजुन तेथे अतिक्रमण चालु आहे. पिंप्राळा ख्वाजामिया नगर येथे योग्य ती कार्यवाही करावी. घरकुलचा हा विषय १० वर्षापासुन पेंडींग आहे. रोज दोन दोन घर विक्री होतात. अतिक्रमण होत आहे. योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.इब्राहिम पटेल :- मा.महापौर महोदया, शासनाच्या निर्देशाप्रमाणे पंतप्रधानांची आवास योजना आहे. तांबापुरा हुडको येथे घरे पडलेली आहेत. जागा जशीच्या तशी पडुन आहे. मेहरुण व इतर ठिकाणी ४०० घरे अपुर्ण अवस्थेत पडुन आहेत . सदर घरकुले पंतप्रधान योजने अंतर्गत पुर्ण करावी. म्हणजे गरिबांना घरं मिळतील. यापुर्वी या संदर्भात ठराव करुन ही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

मा.आयुक्त :- मागच्या महासभेत ठराव झालेला आहे. शासनाकडे ठराव पाठविलेला आहे. शासनाकडुन मंजुरी प्राप्त झाल्यावर पुढची कार्यवाही होईल.

श्री.नितीन लढढा :- मेहरुण शिवारात त्या जमिनीचा भुसंपादनाचा मोबदला देऊन ही अनेक वर्ष झालीत. घरकुल योजना अपुर्ण अवस्थेत उभी आहे. त्याला लागुन असलेली जमिन मनपाची मालकीची आहे. त्यानंतर ३ वर्षापुर्वी घरकुल योजनेसाठी सदर ठिकाणी मनपाचे मालकीचे जागेसाठी ४ कोटीचा मोबदला दिला गेला. तरी सुध्दा जमिनीचा ताबा जमिन मालकाकडेस आहे. याबाबत दोन तीन महासभेत प्रश्न उपस्थित केला. प्रशासन जमिन ताब्यात घेण्याबाबत उत्सुकता दाखवत नाही. कोट्यावदी रुपयाचा मोबदला दिल्यावर ही जमिन मालक व्यवसाय करतात. अश्या अनेक जमिनी आहेत. कोट्यावधी रकमेच्या जमिनी आहेत. जर जमिनी ताब्यात नाही घेतल्या तर भविष्यात तेथे अनधिकृत वसाहती होतील. आणि पुनश्च ते काढण्यासाठी आपल्याला कार्यवाही करावी लागेल. तरी आपण स्वत: जाऊन व्हिजीट करावी व आपण लवकरात लवकर कार्यवाही करुन संपुर्ण जमिन ताब्यात घेऊ.

मा.आयुक्त :- श्री.धामणे माहिती घेऊन सादर करा.

श्री.इब्राहिम पटेल :- साहेब हे जुने लोकं आहेत. यांना सर्व माहित आहे. पण त्यांची मनस्थिती दाखविण्याची नाही.

श्री. कैलास सोनवणे :- नितीन भाऊ, मेहरुण घरकुलाबाबत बोलु शकत नाही का तुम्ही ? तेथे नगरसेवकांचे पत्त्यांचे अड्डे आहेत.

श्री.सुनिल महाजन :- बिल्कुल नाही.

श्री.प्रशांत नाईक :- अप्पा अजिबात नाही.

श्री.नितीन लढढा :- प्रत्येक व्यवसाय तिथे चालतो.

श्री.कुलभुषण पाटील :- डॉकेट वरील विषय घेण्यात यावे. इतर विषयांची चर्चा सभागृहात करु नये.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव महानगरपालिका हद्दीतील पिंप्राळा शिवारातील गट नं.२१४/४ या मंजूर भूमी अभिन्यास मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील पत्र जा.क्रं.जमीन/बिनशेती/एसआर/२२/२०११ दिनांक १२/०९/२०११ अन्वये रहिवासी प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहेत. या मंजूर अभिन्यासात नियमानुसार २५४८.०० चौ.मी. खुली जागा आहेत. दिनांक १०/०६/१९९६ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार, भूमि अभिन्यासातील खुली जागा त्याच

अभिन्यासातील भुखंड धारकांना मिळायला पाहीजे कारण भुखंड खरेदी करतांना त्यांनी या खुल्या जागेसाठी अप्रत्यक्षपणे पैशे भरलेले असतात.

गुलशने रजा मल्टीपर्पज फॉऊंडेशन, आजाद नगर पिंप्राळा जळगांव ही नोंदणीकृत संस्था असून सामाजिक, शैक्षणिक, वैदयकिय कामासाठी आझाद नगर पिंप्राळा येथील गट नं.२१४/४ खुली जागा (ओपन स्पेस) मिळणेबाबत अध्यक्ष, गुलशने रजा मल्टीपर्पज फॉऊंडेशन, आजाद नगर पिंप्राळा जळगांव यांनी दिलेल्या अर्जानुसार आझाद नगर पिंप्राळा येथील गट नं.२१४/४ खुली जागा (ओपन स्पेस) देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त खुली जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०   प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे सुरेश माणिक**
**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

नगरसचिव विषय क्र.१६) झूलेलाल सिंधी एज्युकेशन सोसायटी व्दारा संचलित आदर्श सिंधी हायस्कूल,जळगांव शाळा चालविण्यासाठी म.न.पा.मुरलीधर लधाराम वालेचा शाळेची इमारतीची मुदत वाढून मिळण्याकामी झूलेलाल सिंधी एज्युकेशन सोसायटी, कंवर नगर, जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्र.८५७ दि.१४/१२/२०१० अन्वये म.न.पा.मुरलीधर लधाराम वालेचा शाळेतील पहिल्या मजल्यावर शाळा चालविण्यास सन २०१९ पावतो परवानगी दिलेली असून सदर शाळेतील इमारतीचे भाडे प्रतिवर्ष शिक्षण मंडळास प्राप्त होत असते. संस्थेने सदर इमारती ताब्यात घेतल्यानंतर इमारतीचे रंगरंगोटी, बोलके चित्र, क्रिडांगणाचे विकास, इत्यादि अनेक कार्यावर १५-२० लाख रुपये खर्च केलेले आहेत.

तसेच महासभा ठराव क्रं.१५५४,दि.२२/०४/२०१३ अन्वये शाळेत तळ मजल्यावर चार-पाच वर्ग खोल्या संस्थेस देण्यास आले आहे. तथापि प्रत्यक्ष फक्त दोन वर्ग खोल्या ताब्यात देण्यात आले असुन ठरावानुसार उरलेली दोन-तीन खोल्या ताब्यात देणेबाबत संस्थेने मागणी केलेली आहे.

विदयार्थ्यांच्या संर्वागिण विकास होण्यास उपयोगी कला गुणांच्या व कौशल्यांस प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्य शाळेस व प्रकल्पास संस्थेचे समाजहिता साठी ठरलेल्या स्वपनंना साकार रुप देण्यासाठी जागेची कमतरता होत आहे.

सदर शाळेच्या इमारतीचे भाडे महाराष्ट्र शासनाकडून म.न.पास अदा होत आहे. सदर शाळा अनुदानित असून भरमसाठ विदयार्थी संख्या वाढली आहे व पुढे सुध्दा दिवसें दिवस वाढणार आहे. शाळेच्या प्रगतीसाठी व विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता तळमजल्या वरील चार-पाच वर्ग खोल्यांचे ताबे तसेच इमारत शालेय उपयोगासाठी नियमानुसार मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०   प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- आहूजा मनोज नारायणदास**
**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

नगरसचिव विषय क्र.१७) सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा वर्षानुवर्षे थकित रक्कमांच्या विषयावर उहापोह होऊन, मार्गदर्शक धोरण निश्चित होणेबाबत मा. उपमहापौर डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे, यांचे आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

(सन्मा.सदस्य श्री.दत्तात्रय देवराम कोळी यांचे सभागृहात आगमन झाले.)

श्री.धिरज सोनवणे :- म.न.पा. सेवानिवृत्त कर्मचारी यांची पेन्शन विक्री, ७ ते ८ वर्षापासुन बंद करण्यात आलेली आहे. सदर पेन्शन विक्री शासनाच्या कोणत्या नियमानुसार बंद केली आहे व कोणाच्या आदेशाने केली ही व कशी बंद केली याची प्रशासनाने माहिती द्यावी. तसेच पेन्शन विक्री केव्हा सुरु करणार आहे त्याचे नियोजन काय ? याची माहिती मिळावी. दि.१४/०२/२०१८ उच्च न्यायालयाच्या आदेशाने व नगरसविकास विभागाचे दि.०६/०९/२०१८ चे पत्रानुसार एकुण ६० कर्मचारी यांची वय शितील करुन सेवानिवृत्त विषयक लाभ देण्याबाबत काय कार्यवाही केली. एक त दीड कोटीची थकबाकी आहे. कर्मचाऱ्यांना ३० ते ३५ वर्ष सेवा करुन निवृत्त कर्मचाऱ्यांना कोर्टात गेल्यावरच निवृत्ती नंतरचे पैसे

मिळतात असे का ? अशी त्यांची आजची परिस्थिती झालेली आहे एकूण २०१८ पर्यंत याबाबत मनपाचे जबाबदारी काय आहे नियम काय व शासनाचे नियम काय आहे याची माहिती मिळावी. मनपा मध्ये 2 वर्ष चकरा मारून पेंशन साठी फीरावे लागते त्यानंतर कुटुबांचे काय हाल होतात याची पण त्यांची काळजी घेण्यात यावी तसेच सेवानिवृत्त मनपा कर्मचारी कीती आहेत एकूण कुटुंब वेतन धारक कर्मचारी कीती आहेत पेंशन सुरू न झाल्याचे कर्मचारी कीती आहेत शासनाला व न्यायालयाला आवश्यक अहवाल केव्हा सादर करणार याची माहिती प्रशासनाने दयावी मनपा सेवानिवृत्त कर्मचारी यांची माहिती डिजीटल करून ठेवणे आवश्यक आहे व त्याचे अधिकृत संगणकीकरण करणे काम आहे .पेंशन विक्री शासनाने कोणत्या नियमानुसार बंद केली याची माहिती महाशय महापौर प्रशासनाने दयायला पाहीजे .

श्री.चंद्रकांत वांद्रे :- मा.सभागृह ज.श.म.न.पा. जा.क्र.६७६ दि.१६/०८/२०१६ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे पेन्शन विक्रीच्या (अंशराशीकरण) रकमा आर्थिक स्थितीमुळे सद्या देणे शक्य होत नाही. पेन्शनचाच एक वेगळा फार्म म्हणजे पेन्शन विक्री आहे. करीता पेन्शन विक्रीच्या (अंशराशीकरण) रकमा जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारलेनंतर निधीचे उपलब्धतेनुसार व प्रतिक्षा यादीप्रमाणे अदा करण्यात याव्यात. रकमा उपलब्ध झाल्यानंतर अदायगीबाबत तसे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. तुर्त पेन्शन विक्री स्थगीत करण्यात येत आहे असे तत्कालीन आयुक्त श्री.जीवन सोनवणे यांनी आदेश दिलेले आहेत.

श्री.धिरज सोनवणे :- आता पर्यंत किती वर्ष झाले त्यांना मनपाच्या आर्थिक परिस्थितीचे कारण आपण सांगतो. भुसंपादनासाठी ते कोर्टात जातात. त्यावेळेस त्यांना पैसे देण्यासाठी आपण पैसे जमा करतो. या कर्मचाऱ्यांनी ३० ते ३५ वर्षापासुन सेवा पुर्ण केली. त्यांना पैसे देण्यासाठी अर्थ संकल्पात तरतुद करायला हवी होती व कर्मचाऱ्यांना टप्प्या टप्प्याने रकमा द्याव्यात.

श्री.चंद्रकांत वांद्रे :- मा.महापौर महोदया, भुसंपादन हा विषय टोटली वेगळा आहे. आणि पेन्शन विक्री हा विषय टोटली वेगळा आहे.

श्री.धिरज सोनवणे :- कर्मचाऱ्यांना दयाना पैसे .

श्री.चेतन सनकत :- महिन्यात दोन चार कर्मचाऱ्यांचे का होईना पण त्यांना दयावेत बाकी ठेवूच नये काहीतरी दया सर्वांचे ठेवू नका

श्री.सुनिल खडके :- कुटुंबाचा प्रश्न आहे. कुटुंब हे पेन्शनवरच अवलंबुन आहे. डिजीटल माहिती तयार करावी. थोडीफार का होईना टप्याटप्याने त्यांना दया समिती तयार करावी .

श्री धिरज सोनवणे :- पेंशन धारकांना कधी रकमा देणार याची माहिती दया आधी रक्कम किती आहे त्याची माहिती द्यावी. असे कोणते १००-२०० कोटी रुपये आहे की आपण देऊ शकत नाही. एवढी रक्कम असेल तर मान्य आहे.

श्री.सुनिल खडके :- थकबाकी किती आहे ? एक कोटीच्या जवळपास काही तरी थकबाकी आहे तर त्याचे टप्पे करुन देऊन टाका.

श्री धिरज सोनवणे :- शिक्षकांच्या बाबतीत पण असेच आहे. महापौर महोदया सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची एक डिजिटल माहिती तयार करा.ज्याच्यावर ते पेन्शन धारकांची संपुर्ण सर्व्हीस ,केलेले काम त्याची माहिती तयार करायला हवी प्रशासनाकडुन. त्यांनी सेवा केलेली आहे आपल्याकडे पाय घासुन घासुन थकुन गेलेले आहे ते फिरुन फिरुन त्यांना पेन्शनचे पैसे मिळत नाही .ऐवढीपण भिकारी सारखी परिस्थिती आपली नाही .एक विनंती आहे मा.महापौर ही जी आपण चर्चा करत आहोत याची तुम्ही एक समिती तयार करा. त्यात महापौर, उपमहापौर सभागृहातील २ सदस्य अशी समिती तयार करावी.

श्री.नितीन लढढा :- अप्पा पेन्शनचा विषय जसा गंभिर आहे तसाच न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा विषय ही गंभिर आहे. आज आपल्याकडे साधारणत: १०२ न्यायालयीन कर्मचारी आहे आणि त्या न्यायालयीन कर्मचारींना सन २०१३ पासुन महागाई भत्ता देण्यात येत नाही. आज इतकी बिकट परिस्थिती आहे की त्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांना महिना किती मिळतो तर रु.३१५ /- प्रति दिवस या प्रमाणे मिळतो. नावाला तो कर्मचारी महानगरपालिकेचा आहे. परंतु रु.३१५ /- रोजाने तो आज काम करतो आहे. साधारणत: त्यांना २०१३ पर्यंत महागाई भत्ता मिळत होता. आज सन २०१९ येऊन गेलं आणि कुठल्याही प्रकारचा त्यांना महागाई भत्ता भेटत नाही. Lower Upper Standard Grade मध्ये तो कर्मचारी मोजला जातो. तो म्हणजे झेपडपट्टीतला ही माणुस नाही आहे की त्या दारिद्रय पध्दतीने आपला जिवन जगु शकतो ना एका Living Standard प्रमाणे आपला जिवन जगु शकतो. अश्या परिस्थिती मध्ये त्यांचे मुलांच्या शिक्षणाचा खर्च, वैद्यकीय खर्च, या सर्व बाबीतीत तो कर्मचारी अक्षरश: मेटाकोटीला येऊन गेलेला आहे आणि महागाई भत्ता देण्याचे संदर्भात नियमाची काय अडचण आहे. सन २०१३ पासुन आपण त्यांना महागाई भत्ता लागु केलेला नाही. या पुर्वी त्यांना

महागाई भत्ता दिला जात होता. कमीत कमी बदलत्या परिस्थिती बदलत्या खर्चाची बाबतीमध्ये त्यांचा सुध्दा ताळमेळ होणं ही सुध्दा गरजेची बाब आहे. या संदर्भात एक धोरणात्मक निर्णय आपण महासभा ठराव क्र.६७६ सन २०१७ ला घेतलेला होता. या संदर्भात प्रशासनाने कुठेतरी तो आपलाच कर्मचारी आहे आणि त्याच्यावरती या महापालिकेच्या सर्व कामांची भिस्त अवलंबुन आहे. आणि तश्या परिस्थीती मध्ये तो नैराश्येच्या भावनेने काम करत असेल तर निश्चितपणे आपण त्यांचेकडुन चांगल्या कामाची अपेक्षा सुध्दा कश्या पध्दतीने ठेवु शकता. या महानगरपालिकेतील संपुर्ण कर्मचारी असतील संपुर्ण अधिकारी असतील यांच्या बाबतीत तीच परिस्थिती थोडया थोड्या फरकाने का होई ना. तिच परिस्थिती निर्माण झालेली आहे. अधिकारी कमी असल्याकारणाने पदोन्नत्या देता येत नाही. एक एक अधिकाऱ्याकडे चार चार चार्ज आहे आणि अश्या परिस्थितीमध्ये त्या अधिकाऱ्यांकडून चांगले कामाची अपेक्षा ठेवणं ते ही रास्त नाही. याबाबत ही प्रशासनाने या सर्व बाबींचा विस्तृत खुलासा करावा. जेणे करुन त्या कर्मचाऱ्यांचे काम होईल की नाही होईल त्यांनी अपेक्षा ठेवाव्या की नाही ठेवाव्या त्याचा खुलासा करावा.

श्री. जितेंद्र मराठे :- ज्या कर्मचाऱ्यांचा ११२ नंबर असेल तो आपोआप पुढे येत असतो तो पुढे पुढे सरकत असतो अस करत करत तो ११ व्या नंबर पर्यंत पोहचतो आणि त्याला सांगण्यात येत की तुझा ५६ नंबर आहे म्हणजे या यादया मध्ये पण त्यांना सेवानिवृत्ती देतांना व पैसे देतांना पण कुठे ना कुठे गैरप्रकार होतो हा सभागृहामध्ये निदर्शनास आणून देतो आपण महापौर , उपमहापौर यांनी योग्य ते आदेश दयावे संबधित अधिकाऱ्यांना .

श्री.कैलास सोनवणे :- उत्तर कोण देईन कोण आहे त्याला बोलवा .पाटील साहेब या तर जरा कर्तव्यदक्ष अधिकारी आहे .

श्री. राजेंद्र पाटील :- ज.श.म.न.पा. रोंजदारी कर्मचारी यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार समान काम समान वेतन देण्या संदर्भात प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे मा.आयुक्त सो यांच्या कडे प्रस्ताव दाखल करून तो शासनाकडे पाठविण्यात येईल .

श्री .कैलास सोनवणे :- काय आहे ते सांगतो मी तुम्हाला कधीचं तयार आहे समान काम समान वेतन याच विचारतच नाहीये ते नंतर पहिले महागाई भत्याच काय आहे ते सांगा त्यांनी प्रश्न काय विचारलेला आहे नितीनभाऊंनी

श्री.राजेंद्र पाटील :- मी आता दोन दिवस झाले आहे हा विषय माझ्याकडे आलेलाच नाहीये आजच मला समजलेला आहे मी ती पुर्ण माहिती घेतो आणि पुर्णपणे निकाली करायला लावतो

श्री.नितीन लढढा :- तुम्ही १५ दिवस रजेवर होते १५ दिवसांपुर्वी नाही त्यांना बोलू दया काय आहे कमीत कमी

श्री. मराठे :- सन्मा . व्यासपीठ महागाई भत्याचा विषय आहे २०१३ ला मान्य झालेला आहे त्याच्यानंतर त्याची मान्यताही घेतलेली आहे पुर्वी त्याच्यावर कोणतीही मान्यता घेतलेली नव्हती .

श्री.कैलास सोनवणे :- तीन चार्ज आहेत दुसरीकडे लक्ष देईन तर कस होईल. एक तर ४ चार्ज आहेत त्यांच्याकडे ते कुठे कुठे लक्ष देतील साहेब. आता एक दुसरा विषय आहे समान काम समान वेतनच प्रकरण आपण तुमच्याकडे ठेवल होत. हया राजु पाटील यांच्या वेळी आपण पुर्वीच तुमच्याकडे ठेवलेले आहे ते त्यावर तुम्ही डिस्कस लिहील त्यानंतर तुम्ही सांगीतल महासभेत ठेवा मग ते खोडल परत ते पत्र शासनाकडे पाठवल.

मा. आयुक्त :- ते प्रलंबीत आहे .

श्री.कैलास सोनवणे :- ते प्रलंबीत नाही आहे साहेब सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागलेला आहे समान काम समान वेतन दयाव त्यानुसार तुम्ही तो निकाल फक्त चेक करायचा होता तो जर निकाल चेक केला असता त्याची सत्यता पडताळून पाहुन खालपासुन ते वरपर्यंत जे रिमार्कस दिलेले आहे त्याबाबत पण सांगीतलेले आहे आपण पण महासभेत ठेवू हे पण बरोबर आहे पण त्याच काय झाल ते काही समजल नाही आम्हाला आमच म्हणण हे आहे की तो ठराव मंजुर करून आणि तो लागू करावा मग शासनाकडे पाठवावा रितसर काय करता त्याचं ?

मा.आयुक्त :- सुप्रिम कोर्टचा जो निर्णय आहे. तो ह्या केसला लागु नाही दुसऱ्या केसचा आहे. या केसमध्ये झालेले नाही. दुसऱ्या कुठल्या तरी केस मध्ये लागलेला आहे. आणि या केस मध्ये हे निर्णय लागु करायचा किंवा नाही त्यासाठी शासनाकडुन मार्गदर्शन मागविलेले आहे.

श्री.कैलास सोनवणे :- समान काम समान वेतन याचा निकाल लागला तर तो याला ही लागु होईल.

मा.आयुक्त :- निकाल काय लागेल आणि काय नाही याच्यात आपण जायला नको.

श्री.कैलास सोनवणे :- साहेब, विधी शाखेने फॉर म्हणुन मार्गदर्शन दिल्यानंतर आपण परत तिकडे का पाठवलं. विधी शाखेकडुन काही वेगळ अपेक्षित होत का ? विधी शाखेकडुन मार्गदर्शन का मागवलं मग आपण मला सांगा बरं. विधी शाखेकडुन परत मार्गदर्शन मागवलं आहे.

मा.आयुक्त :- मार्गदर्शन शासनाकडुन मागवलं आहे.

श्री.कैलास सोनवणे :- शासनाकडुन मागवलं नाही. आपण ते शासनाकडे पाठवलेलं आहे फक्त. मग त्याचा पाठपुरावा करणेसाठी .

मा.आयुक्त :- मार्गदर्शन मागवलेलं आहे की नाही ते पत्र आपण बघुन घ्यावं.

श्री.कैलास सोनवणे :- त्याला भरपुर दिवस झालेले आहे. आणि तुम्ही सांगितलेलं होतं की, मी १५ दिवसात करतो.

मा.आयुक्त :- ते शासनाकडुन केव्हा येईल आपण शासन थोडीच आहोत.

श्री.नितीन लढढा :- आम्ही सदस्यांची समिती गठीत करतो. समिती अभ्यास करेल.समिती अहवाल देईल. त्याच्या वरती निर्णय होईल. त्या पध्दतीने प्रशासनाने त्याची अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात अडचण वाटत असेल किंवा मानसिकता नसेल. तश्या परिस्थिती मध्ये या संदर्भात राज्य शासनाचे मार्गदर्शन मागविणे उचित होईल. कारण राज्य शासन माहिती आहे आपल्याला की ते अथांगसागर आहे. जळगांव महानगरपालिके सारखे इतर संपुर्ण महाराष्ट्रातील लाखो पत्र व्यवहार होत राहतात. आपल्या प्रकरणामध्ये सकाळी ठेवलेली फाईल दुपारी कुठे जाते हे आपल्याला माहित नसते. तर ते राज्य शासनाकडेस गेलेला पत्र व्यवहार तो योग्य वेळेस त्याचे मार्गदर्शन मिळेल याची काही गॅरंटी नाही. परंतु याच्या अनुषंगाने त्या सामान्य कर्मचाऱ्यांनी अपेक्षा व्यक्त करायची कोणाकडे ? सभागृहाकडे अपेक्षा व्यक्त केली सभागृहाने आपली भुमिका मांडली. राज्य शासनाकडे परवानगी संदर्भात आपण आपली भुमिका घेतली. पत्र व्यवहार गेलेला आहे. वर्षानुवर्ष या प्रक्रियेमध्ये जातात. आणि वर्षानुवर्ष तो कर्मचारी या अपेक्षेने आपल्याकडे पाहत असतो. हे आयुक्त आले तर न्याय मिळेल ते आयुक्त आले तर न्याय मिळेल. ही बॉडी आली तर न्याय मिळेल ती बॉडी आली तर न्याय मिळेल. हा सदस्य आला तर आम्हाला न्याय मिळेल परंतू त्याच्या नशीबी न्याय नाही हया विषयी प्रशासनाला काही धोरणात्मक निर्णय अपेक्षीत असेल तर तसा प्रस्ताव तयार करा आपण एका मिनीटात तसा प्रस्ताव यासभागृहात पारीत करू, परंतू त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनतून आपण विचार केला तर आपण जाता जाता या कर्मचाऱ्यांची अडचण सोडवून जाल सर .

श्री.कैलास सोनवणे :- समान काम समान वेतन मिळण्याच्या संदर्भात शासनाकडे पत्र पाठवाव आणि पाठपुरावा करावा अशी विनंती करतो . महागाई भत्याच काय झालेले आहे हया बाबतीत ते प्रकरण यांच्या कडून मागवून त्याची पूर्तता केली तर बर होईल साहेब

श्री. नितीन लढढा :- २०१३ पासून त्यांना महागाई भत्ता लागू करण्यासाठी काही कायदेशीर अडचण आहे का समान काम समान वेतन हा विषय वेगळा असुन त्यांना महागाई भत्ता लागू केलेला नाही त्यांना कुठेतरी कधीतरी महागाई भत्ता लागू होईल व समान काम समान वेतन मिळेल या अपेक्षेने तो महानगरपालिकेच्या सर्वीसेस मध्ये काम करतो

श्री.कैलास सोनवणे :- शासनाकडे प्रस्ताव पाठवावा व त्याचा पाठपुरावा करावा आणि महाभत्त्याची ही पुर्तता करावी

श्री.नितीन लढढा:- २०१३ पासुन त्यांना महागाई भत्ता लागू करण्यासंदर्भात काही कायदेशीर अडचण आहे का ? त्यांना २०१३ पासुन महागाई भत्ता लागू कलेला नाही न्यायालयीन व रोजंदारी वर ३१५ रू . प्रमाणे कर्मचारी काम करत आहेत . म्हणजे तो खाजगी कामावर जाईल तर दिवसातुन १०००/- रू कमाऊ शकेल परंतु महानगरपालिकेत कायम होईल या अपेक्षेने कधीतरी कुठेतरी तो कायम होईल, काम होईल या अपेक्षेने काम करतो . त्यांना महागाई भत्त्याची रक्कम देण्याच्या संदर्भात काही कायदेशीर अडचण असेल तर प्रस्ताव तयार करून त्यावर निर्णय घ्यावा किंवा आणि देता येत नसेल तर निर्णय घेवुन टाका आज सभागृह त्यांना समान वेतन देण्याकरीता तयार आहे

मा.आयुक्त :- विभागाकडुन जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यांचा महागाई भत्ता हा शासनाकडून मंजुर झालेला होता आणि दरवर्षी शासनाकडून महागाई भत्ता मंजुर होतो पण त्यानंतर तसा महागाई भत्ता शासनाकडून मंजुर झालेला नाही . पत्रव्यवहार करून त्याचा पाठपुरावा सुरू आहे. तरी पुढील कालावधीचा महागाई भत्ता मंजुर झालेला नाही . तो मंजुर झाला की देण्यात येईल .

श्री.नितीन लढढा :- याबाबतीत पाठपुरावा करणे खुप मोठ काम आहे . आणि हा विषय आपण तेथे जाऊन मार्गी लावू शकतात . आपल त्या ठिकाणी वेगळ वजन आहे , कर्मचाऱ्यांच त्या ठिकाणी वेगळ वजन आहे आपणांस सभागृहाची कर्मचाऱ्यांच्या वतीने विनंती आहे की आपण हा विषय मार्गी लावावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर उपदान, पेन्शन विक्री, अर्जित रजेच्या रोखीकरणाची रक्कम, भविष्यनिर्वाह निधीची रक्कम इ. रकमा तात्काळ प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु असे निर्दशनास आलेले आहे की, सुमारे २०१० पासुन बऱ्याचश्या थकीत रकमा सेवानिवृत्ती धारकांना अदा करण्यात आलेल्या नाहीत. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर अद्यापपावेतो निवृत्तीवेतन सुध्दा लागु

करण्यात आलेले नाही. सदरची बाब अत्यंत खेदजनक असुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक आहे. सेवानिवृत्त धारकांच्या हक्काच्या रक्कमा महानगरपालिकेने वर्षानुवर्षे थकित ठेवल्याने या कर्मचाऱ्यांना वृध्दावस्थेत आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागत आहे. अनेकांची स्थिती हलाखीची झालेली आहे परंतू आर्थिक अडचणीचे कारण पुढे करुन रक्कमा प्रशासनाने रोखुन धरलेल्या आहेत अश्या स्वरुपाच्या तक्रारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडुन प्राप्त झालेल्या आहेत.

करिता सेवानिवृत्त वेतनाचा फरक, उपदान, निवृत्ती वेतन अंशराशीकरण, सेवानिवृत्ती पुर्व काळातील संचित रजेचे रोखीकरण आदी थकीत रक्कमा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तात्काळ प्रदान करणेबाबत प्रशासनाने आर्थिक नियोजन करुन असलेल्या सर्व थकीत रकमा अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच ज्या सेवानिवृत्त धारकांना अद्याप निवृत्ती वेतन लागु केलेले नसेल त्यांना तात्काळ सेवानिवृत्तीवेतन / कुटुंबवेतन लागु करणेबाबतची कार्यवाही प्रशासनाने करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०　　　प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

नगरसचिव विषय क्र.१८) मनुष्यबळाची टंचाई भासत असल्याने रोजंदारी /मानधन तत्वावर कर्मचारी नियुक्ती करणेबाबत मा. उपमहापौर डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे, यांचे आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

श्री. धिरज सोनवणे :- रोजंदारी ऐवजी कंत्राटी करून घ्यावे , महापालिकेच्या बऱ्याचशा विभागांमध्ये कर्मचारी कार्यरत असुन त्यांची संपुर्ण माहिती सर्व विभागाकडुन मागविण्यात यावी की कोणत्या विभागात किती कर्मचारी लागणार आहेत . विविध पद असतील म्हणून आपल्याला माहिती मिळेल की किती कर्मचारी लागत आहेत पुढील १ वर्षामध्ये बरेचशे कर्मचारी सेवानिवृत्त होणार असुन मनुष्यबळाची टंचाई आपल्याला भासणार आहे त्यानुसार कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी .

श्री.नितीन लढढा :- या अनुषगांने आकृतीबंध आपण मान्यतेसाठी शासनाकडेस पाठविलेला आहे . मला वाटते की बघता बघता इतक्या आकृत्या डोळयासमोर येवुन गेल्या परंतु आकृतीबंध हा राज्यशासनाकडे पाठविलेला आहे . आकृतीबंध तयार होतो आहे , आकृतीबंधाचे असे कोणते बंधन बांधले गेले आहे की ते बंधनच सुटत नाही आहे .

श्री.कैलास सोनवणे:- आस्थापना विभाग लक्ष देत नाही. २०१३ मध्ये बोखड साहेब असतांना आपण ते मंजुर करून आणल असते

श्री.नितीन लढढा :- त्याविषयात माहिती काढली तर पदोन्नत्याच्या विषय आहे त्या रखडलेल्या आहेत अनेक कर्मचाऱ्यांना अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे राजकीय व प्रशासकीय दोन्ही सोबत घेवून हा विषय मार्गी लावण्यात यावा यामुळे नविन भरती आपणांस करता येवु शकते .

श्री.विष्णु भंगाळे :- -क्रीडा विभागात क्रीडा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी . तसेच यापुर्वी आम्ही पत्रव्यवहार केलेला असुन वृक्ष अधिकारी या पदाची सुध्दा नियुक्ती करण्यात यावी.

श्री.कैलास सोनवणे :- कर्मचाऱ्याची शैक्षणिक पात्रता तपासुन तसेच इतर बाबी तपासुन हे करण्यात यावे .

श्री.लक्ष्मीकांत कहार (उपायुक्त) :- प्रत्येक विभागाकडुन माहिती घेत आहोत. सदर माहिती एकत्रितपणे तयार झाल्यानंतर सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

मा.आयुक्त :- आपण रोजंदारी वर घेताय की मानधनावर घेत आहोत हयाला आकृतीबंधाचे बंधन नाही , त्यापध्दतीने आपल्याला कंत्राटी पध्दतीने अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल.

श्री.कैलास सोनवणे :- काम केले तर अनुभव नक्की मिळेल.

श्री.जितेंद्र मराठे :- कंत्राटी पध्दतीवर जे नियुक्ती करणार त्यामध्ये वृक्ष तोडीसाठीपण माणसं घ्या. जेणे करुन शहरातील नविन बांधकाम करण्यात येणाऱ्या इमारतींच्या जागेवरील वृक्ष तोडल्यानंतर ते वृक्ष इतरत्र न जाता आपल्या स्मशानभुमी मध्ये कामात येईल. तरी त्याकरीता कर्मचारी नियुक्त करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या जवळ जवळ सर्वच विभागात कर्मचारी / अधिकारी यांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. दवाखाने विभागासारख्या अत्यावश्यक विभागात सुध्दा ही स्थिती आहे. त्यामुळे रुग्णांवरील अत्यावश्यक उपचार इत्यादीत अडचणी उद्भवण्याची स्थिती समोर आली आहे.

महापालिकेच्या विविध विभागात पूर्वी कार्यरत कर्मचारी आता सेवा निवृत्त झाल्याने अनेक जागा रिक्त आहेत. नवीन भरती प्रक्रिया झालेली नाही. तसेच बऱ्याच वर्षापासुन अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. मनुष्यबळाच्या अभावामुळे अत्यावश्यक सेवा पार पाडणेही जिकरीचे होत असल्याची स्थिती आहे. या स्थितीतून मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे याबाबत आस्थापना विभागाने विभागनिहाय व पदनिहाय आढावा घेऊन ज्या ठिकाणी अधिकारी / कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांची शासन निर्णय / शासन परिपत्रकानुसार तात्काळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन / कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व तात्काळ भरती प्रक्रिया सुरु करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**
**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

नगरसचिव विषय क्र.१९) संरक्षण दलातील सैनिकांप्रमाणेच अर्ध सैनिक दलातील सैनिकांना मालमत्ता करात सुट देणेबाबत सन्मा.सदस्य श्री.ललित विजयराव कोल्हे यांचे आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१६/प्र.क्र.७९/नवि २० दि.०७/०४/२०१६ नुसार संरक्षण दलातील आजी / माजी सैनिकांना, त्यांचे विधवांना मालमत्ताकरांत सुट देणे बाबत महासभेने महासभा ठराव क्रमांक ७५८ दि.२६/०९/२०१७ व ७८२ दि.१६/११/२०१७ ठरावाव्दारे सुट देणे बाबतचा प्रस्ताव पारित केलेला असुन त्याची अंमलबजावणी सुरु आहे. संरक्षण दलातील सैनिकांव्यतिरिक्त आसाम रायफल, इंन्डो टिबेटीयन बॉर्डर पोलिस, बॉर्डर सिक्युरीटी, सशस्त्र सैनिक दल, सेंट्रल रिझर्व्ह पोलिस फोर्स, सेंट्रल इन्डस्ट्रीयल सिक्युरिटी फोर्स, नॅशनल सिक्युरीटी फोर्स हे जवान देखील देशाच्या सुरक्षतेसाठी घरापासुन लांब सेवा देत असतात. मात्र सदर शासन निर्णयात त्यांना त्यांच्या गावाकडील असलेल्या राहत्या घराचे मालमत्ता करात सुट देणे बाबत तरतुद नाही.

नुकताच पुलवामा येथे सी.आर.पी.एफ. च्या जवानांवर अतिरेकी आत्मघाती हल्ला झाला त्यात ४२ जवान शहीद झाले. करिता महासभा ठराव क्रमांक ७५८ दि.२६/०९/२०१७ व ७८२ दि.१६/११/२०१७ प्रमाणेच जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील आसाम रायफल, इंन्डो टिबेटीयन बॉर्डर पोलिस, बॉर्डर सिक्युरीटी, सशस्त्र सैनिक दल, सेंट्रल रिझर्व्ह पोलिस फोर्स, सेंट्रल इन्डस्ट्रीयल सिक्युरिटी फोर्स, नॅशनल सिक्युरीटी फोर्स वगैरे अर्धसैनिकांच्या असलेल्या एका मिळकतीला मालमत्ताकरांत सुट देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- खडके विश्वनाथ सुरेश**
**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

नगरसचिव विषय क्र.२०) आरोग्य अधिकारी पदावर डॉ.विकास पाटील यांची पदस्थापना करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे व इतर सन्मा.सदस्यांनी दिलेल्या यादी प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सचिन पाटील :- प्रस्ताव जो आहे हा मान्य करावा. मा.नितीन भाऊ एक मिनिट फक्त आपल्या परवानगीने बोलतो. जळगांव शहर महानगरपालिका ही अशी एकमेव महानगरपालिका राज्यामध्ये आहे की ज्याचा आरोग्य अधिकारी हा मेडीकल शैक्षणिक अर्हता घेतलेला नाही. हे म्हणजे निंदनिय व हस्यास्पद बाब आहे. सभागृहाकरता ही आणि प्रशासनाकरीता ही. जर त्या दृष्टीने जे आपले विकास पाटील हे या महानगरपालिका प्रशासनात सेवा करत आहे आणि दुसरीकडे जन्म-मृत्यु विभागात कारभार व्यवस्थीत प्रकारे बघत आहेत. जो ठराव पुर्वी झालेला आहे. उदय पाटील यांना घ्यायचा तो रद्द करुन ह्या नविन ठराव घेऊन सुचक म्हणुन सांगु इच्छीतो की, श्री.विकास पाटील यांना आरोग्य अधिकारी या पदावर घेण्यात यावे.

श्री.चेतन सनकत :- माझे अनुमोदन आहे.

श्री.नितीन लढढा :- महासभा ठराव क्र. ७३४ दि.०९/०८/२०१७ जळगांव शहर महानगरपालिकेचे अकार्यक्षम आरोग्याधिकारी डॉ.विकास पाटील यांचे विरुध्द कडक कार्यवाही करणे संदर्भात सन्मा.सदस्य श्री.सुनिल सुपडु महाजन यांनी दिलेले यादी प्रस्तावाचे वाचन केले, असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेत आरोग्याधिकारी म्हणुन कार्यरत असलेले डॉ.विकास पाटील हे पुर्णत: अकार्यक्षम आहेत.

श्री.सचिन पाटील :- भाऊ सगळयांना माहिती आहे ठरावात काय आहे वाचन्याची गरज नाही.

श्री.सुनिल महाजन :- नितीन भाऊंना बोलु द्या.

श्री.नितीन लढढा :- मा.आयुक्त साहेब ठराव क्र. ७३४ अन्वये आरोग्याधिकारी श्री.विकास पाटील यांना चौकशी करुन बडतर्फ करण्याची मागणी त्या ठरावामध्ये झालेली आहे आणि त्याच ठरावाच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्त श्री.किशोर राजे निंबाळकर यांनी त्यांची पदस्थापना तेथुन बदलवुन दिली.

श्री.अनंत जोशी :- नितिन भाऊ परवानगी घेऊन बोलत आहेत. ते परवानगी घेऊन बोलता आहेत.

श्री.सचिन पाटील :- जळगांवच्या नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

श्री.नितीन लढढा :- आमची भुमिका मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे. सभागृहात चर्चा करण्याचा सर्वांना अधिकार आहे. तुम्ही दादागीरी करुन असा विषय अडकवता आहेत.

श्री.अनंत जोशी :- हे हे चुकीचं आहे.

श्री.सचिन पाटील :- बंटी भाऊ हा आरोग्याचा विषय आहे.

श्री.सुनिल महाजन :- त्यांना मत मांडु द्या.

श्री.प्रशांत नाईक :- भाऊंना मत मांडु द्या.

श्री.नितीन लढढा :- मत मांडण्याचा आम्हाला अधिकारी आहे. निर्णय तुम्हाला जो घ्यायचा तो घ्या ना पण मत मांडण्याच्या सदस्यांच्या अधिकारावर अश्या प्रकारे गदा आणु नका.

श्री.अनंत जोशी :- अश्विन भाऊ, मा.उपमहापौर साहेब बहुमत तुमचे आहे तुम्ही ठराव करु शकता. तुम्ही भुमिका मांडु देत नाही.

श्री.नितीन लढढा :- मा.महापौर ताई आपण विकास पाटलांना घ्यावं उदय पाटलांना घ्यावं त्यापैकी एकही माझा नातेवाईक नाही. एकही पाटील माझा नातेवाईक नाही.

श्री.कैलास सोनवणे :- बंटी भाऊ तुम्हाला ही विनंती करतो सुनिल भाऊ तुम्हालाही विनंती करतो. नितीन भाऊंच बोलणं झाल्यावर तुम्ही बोला. हे सांगा की कश्यासाठी करतो आहे. तुम्ही सांगा ना की हे कशासाठी करता आहे.

श्री.नितीन लढढा :- मा.महापौर ताई आयुक्तांच्या फक्त निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की ठराव क्र.७३४ हा जो पारीत झालेला आहे. या ठरावाच्या अनुषंगाने ठराव आजही अस्तीत्वात आहे ठरावात जी मागणी केलेली होती. त्यावेळेचा जो काही ठपका आरोग्याधिकारी विकास पाटील यांच्यावर ठेवण्यात आलेला होता. त्या ठपक्याच्या अनुषंगाने त्यांची चौकशी करुन त्यांना बडतर्फ करण्यात यावं व मला प्रश्नाचे उत्तर अपेक्षित आहे प्रशासनाकडुन की त्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनाने त्याची चौकशी सुरु केलेली आहे का ? सुरु असेल चौकशी तर चौकशीचे निष्पण्ण काय निघाले. निष्पण्ण काय निघाले असतील तर पुनश्च: एखाद्या अधिकाऱ्या विरुध्द त्याच खात्याच्या संदर्भातील चौकशी प्रलंबीत असेल तर पुनश्च त्याच पदावर त्या अधिकाऱ्याला बसविणे कित पर्यंत योग्य होईल आणि त्यांना बसविणेचे कारण काय फक्त इतकेच मला प्रशासनाकडुन खुलासा अपेक्षित आहे.

श्री.कैलास सोनवणे :- अजेंडयावर बदल्यांचे विषय यायला नको परंतु याच्या मागे जा आपण मागच्या वेळी अजेंडयावर ठेऊन बदली केलेली आहे म्हणुन हा विषय आला. ठराव करुन बदली झाली त्यांची. मला बोलु द्या आणि याच्या पुढे बदल्यांचे विषय आणु नका. हा प्रशासनाचा विषय आहे. साहेबांचे अधिकार आहेत ते. त्यांनीच पाहावं आणि त्यानंतर मी तुम्हाला हे पण सांगतो साहेब उदय पाटील साहेबांचा ठराव झाला तर त्या अनुषंगाने त्यांना काढलं जाईल. त्यांना सन्मानाने, न्यायाने चांगल्या ठिकाणी त्यांची बदली करा. असे कुठे कोपऱ्यामध्ये टाकुन देऊ नका.

श्री.नितीन लढढा :- त्या वेळेस परिस्थिती अशी होती की त्या वेळेला काही तरी फिनाईल खरेदी झालेली होती. वर्षाताई खडके सभापती होत्या स्थायी समितीच्या आणि सन्मा.सदस्य श्री.पृथ्वीराज सोनवणे त्यावेळेला भाजप चे सदस्य होते. भाजपचे सदस्य श्री.पृथ्वीराज सोनवणे यांनी स्थायी समिती सभेमध्ये आरोप केलेला होता आणि नियमबाहय रु.९०/- लिटर प्रमाणे मिळणारे फिनाईल हे कुठलीही मान्यता न घेता रु.१३००/- लिटर ने ऍडव्हान्स मध्ये खरेदी झालेले होते. अशा प्रकारचे गंभीर आरोप झालेले होते. त्याच्या वृत्तपत्रांचे कात्रणसुध्दा मोबाईल मध्ये आहे.आणि त्यावेळेला सन्मा.सदस्य पृथ्वीराज सोनवणे आणि सन्मा.सभापती वर्षाताई खडके या आपल्या आरोग्याधिकाऱ्यांना घेवुन बालगंधर्व

खुलेनाटयगृहामध्ये गेल्या तिथे जवळपास ६ महिन्यापासुन रु.१३ लक्ष किमतीचा घेतलेल्या फिनाईल व मटेरीयल त्याच अवस्थेत पडलेलं होत. या सगळया गोष्टींचा निष्काळजीपणा बेकायदेशीरपणे केलेली खरेदी अश्या पध्दतीचे गंभीर आरोप त्या वरती होते आणि ज्या वेळेला ठराव क्र.७३४ हा मान्य करण्यात आला होता त्यावेळेला भाजप च्या सर्व सदस्यांनी त्या ठरावाच्या बाजुने मतदान केले होते आणि त्या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केल्यामुळे त्यावेळी सभागृहातील सदस्यांनी केल्यामुळे तश्या पध्दतीचा प्रस्ताव आला की यांची बडतर्फी करण्यापुर्वी चौकशी करणे गरजेचे आहे. कारण त्यांची भुमिका काय आहे ती सुध्दा समोर येणे अपेक्षित होतं. आणि तश्या पध्दतीने ती चौकशी समितीने गठीत केली. परंतु चौकशी समिती चौकशी चालु असतांना त्या अधिकाऱ्याला त्या पदावर ठेवणे हे कितपत संयुक्तीक नव्हतं. आणि त्यांना काढल्यानंतर त्या पदावर पर्यायी व्यवस्था होण्याच्या दृष्टीकोणातन तो उदय पाटलांकडे तात्पुरता चार्ज त्यावेळी देण्यात आलेला होता. ही त्यावेळीची पार्श्वभुमी आहे. असा ठराव या सभागृहामध्ये आणण्याचा अवचित्यही नाही कारण तो नियम नाही आहे. कारण मनपा अधिनियमामध्ये कुठलीही तरतुद नाही आहे की महासभा ठरवेल की अमुक व्यक्तीला या पदावर द्या टमुक व्यक्तीला त्या पदावर द्या. त्या संपुर्ण प्रशासकीय बाबी आहेत. ते आयुक्तांचे स्वतंत्र अधिकार आहे. अश्या पध्दतीचे ठराव आणुन आपण कुठेतरी आपल्याला कायद्याचे अज्ञान आहे. अश्या पध्दतीचं मत इथे व्यक्त होता कामा नये. या दृष्टीकोणाने प्रशासनाने जी नियुक्ती केलेली आहे. की त्या चौकशीचे काय झालेलं आहे. या संदर्भातली भुमिका प्रशासनाने पहिले स्पष्ट करावी. जेणे करुन या ठरावाची तशी ही कायदेशीर अंमलबजावणी करणं. आयुक्तांवर तसं बंधनकारक नाहीये परंतु नेमकी परिस्थीती काय आहे ? चौकशी का प्रलंबीत आहे ? आणि झाली असेल तर त्याचा अहवाल काय आहे ? ही माहिती सभागृहासमोर ठेवावी.

श्री.अनंत जोशी:- महापौर साहेब विनंती करु ईच्छितो की, हा जो ७३४ क्रमांकाचा ठराव केलेला आहे त्याचावर आपण चर्चा तो ठराव या सभागृहामध्ये आरोग्याधिकारी श्री.विकास पाटील यांच्या अनुषंगाने मगाशी माझे सहकाऱ्यांनी ह्या ठिकाणी हे म्हणतायेत आरोग्याधिकारी या पदावर शैक्षणिक पात्रता नसलेल्या माणसाला आपण नियुक्त केलेलं आहे. या महापालिकेमध्ये वाहन विभाग असेल आस्थापना विभाग असेल, विधी शाखा असेल तुमचं आणखी प्रभाग अधिकारी असतील या सगळया ठिकाणी अभियंतेच नियुक्त केलेले आहेत. एकाही ठिकाणी त्यांच्या Caliber किंवा त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा माणुस नाही या ठिकाणी भाजपाला सत्तेवर येवुन ४-६ महिने झालेले आहेत. उदय पाटील पण त्या ठिकाणी कार्यरत आहेत. त्यावेळेस त्यांची शैक्षणिक पात्रता तिच होती. आज त्या ठिकाणी कामकाज बघताहेत. त्यांनी या ठिकाणी काम चांगल्या पध्दतीचं काम केलं, हगणदारी मुक्तीचं त्यांनी ९० टक्क्यापर्यंत वैयकतीक शौचालय मा.नरेंद्र मोदी या ठिकाणी जीव तोडुन स्वच्छता सर्वेक्षण करतायेत ४००० च्यावर शहर भारत देशामध्ये आहेत. ८२ का ८३ नंबरवर आपला नंबर स्वच्छ भारत मध्ये आलेला आहे. ९०% शौचालयाचे नविन काम त्यांनी केलेलं आहे. ईतकी त्यांची काम करण्याची कामे या ठिकाणी दाखवु शकतो आरोग्याधिकारी भुतपुर्व आरोग्याधिकारी श्री.विकास पाटलांनी केलेली ३ कामे या ठिकाणी सांगावे. ज्या वेळी ७३४ चा ठराव केला त्यावेळी अश्विनभाऊ पण होते. या सभागृहात भाजपचे सदस्य होते इतर सदस्य होते आणि सर्वानुमते हा ठराव मंजुर केलेला होता. मला गोष्ट सांगा की त्यावेळेस जर ठराव केला या सभागृहाच्या इतिहासात नगरपालिका असेल किंवा महानगरपालिका असेल एकमेव उदहारण आहे. सभेत असलेले सर्व सदस्य साक्षीला आहेत. या सभागृहामध्ये आरोग्याधिकाऱ्याला शहरामध्ये आरोग्य संदर्भातला भुमरा न वाजवता तीन तेरा वाजवायचे. वारंवार स्थायी समिती असेल महासभा असेल वारंवार सगळे सदस्य या ठिकाणी तक्रारी करायचे तक्रारींच्या अनुषंगाने कंटाळुन त्यांचे पाय धरायची आवश्यकता येथे वाटली होती. मी या सभागृहाचा सदस्य म्हणुन या सभागृहामध्ये चालु मिटींग मध्ये आरोग्याधिकारी विकास पाटील यांचे पाय धरले होते म्हणजेच त्यांचे कामाची पध्दत काय असेल ते तुम्ही विचार करु शकता. अश्या माणसाला परत त्याच पदावर नियुक्ती आपण देत आहोत आणि आज या ठिकाणी आपण ७५ कोटीचा एकमुस्त ठेका देण्याच्या अनुषंगाने विचार करत आहोत. त्याची ई-निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. फक्त जी प्रक्रिया थोडीफार बाकी आहे ती प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात असतांना इतक्या घाईगडबडीने इतक्या तातडीने विकास पाटलांची त्या ठिकाणी नियुक्ती करायची आणि उदय पाटलांना तेथुन उचलायचं याचे मागचं कारण काय ? त्याची गरज काय वाटते आहे आज. आणि आपल्याकडे इतके पदं आहे ज्याच्यावर त्यांचे शैक्षणिक पदाचे माणसं त्या ठिकाणी कार्यरत नाही आहे. मग त्याच्यासाठी पण हाच नियम लावणार का ? आणि त्यासंदर्भात विकास पाटलांच्या संदर्भात सदस्य तक्रारी करायचे व इतर सदस्यपण करायचे.

श्री.कैलास सोनवणे :- इतक मांडल तितक सत्य आहे जे जे सांगीतल ते ते सगळ घडलेल आहे मी त्या वेळेस खान्देश विकास आघाडीचा सदस्य होतो मला मतदान चा अधिकार नसला तरी मी त्या बाजुने होतो माझी मिसेस सौ.भारती सोनवणे ही खान्देश विकास आघाडीची नगरसेविका होती ती जर त्या मिटींग होती ती पण त्याच बाजुला होती याच्या

मध्ये काहीच दुमतच नाही त्या करीता त्यांची जी चौकशी चालु आहे ती चौकशी कोणत्या टप्प्यात आहे ती पाहावी चौकशीच्या आधीन राहून त्यांना तीथे घ्याव . आणि विकास पाटलांना सुध्दा न्याय दयावा. आणि याच्या पुढे बदलीचे विषय या सभागृहाच्या पटलावर ठेवू नये एवढीच विनंती आहे.

श्री.अनंत जोशी :- अशा पध्दतीन त्याच खच्चीकरण ....

श्री.नितीन लढढा :- बघा आता एखादा विषय असा घाईघाईने किंवा अशा आपातकालीन परिस्थिती मध्ये सभागृहामध्ये आणण्यात ज्यावेळी आणण्यात येतो .

श्री.कैलास सोनवणे:- एक मिनीट हॉलमध्ये महापौर दालनात त्या ठिकाणी माझ्या माहितीनुसार मला ती माहिती मिळाली की त्यांनी स्वताहुन सांगीतल की माझी बदली करून टाका म्हणून

श्री.नितीन लढढा :- बघा बघा.

श्री.सुनिल महाजन :- काही अडचण होती का बदली करायला , विभागप्रमुखाची बदली करायला काय अडचण होती .

श्री.कैलास सोनवणे :- नाही नाही अडचण होती , ठरावाची अडचण होती ना

श्री.नितीन लढढा:- विकास पाटील साहेब राहीले काय आणि उदय पाटील साहेब राहीले काय त्याच्याने आमच्या सारख्यांना काही फरक पडणार नाही. याच्या अनुषगांने अप्पा एक सामान्य जनमानसात किंवा महानगरपालिकेच्या वर्तुळात वेगळया प्रकारच्या चर्चांना उधान येतात की महानगरपालिकेचा एकमुस्त ठेका हा अंतीम टप्प्यात आहे.

श्री.कैलास सोनवणे :- एक मिनीट मला बोलू दया ह्या ठिकाणी त्याची काय गरज आहे. ह्या ठिकाणी कायसंबध आहे.

श्री.अनंत जोशी :- कारण ते सोईस्कर आहे.

श्री.कैलास सोनवणे :- अरे सगळेच सोईस्कर आहे येथे आता.

श्री.अनंत जोशी :- संशय आहे. परवानगी घेऊन बोला.

श्री.सचिन पाटील :- बंटी भाऊ सोईस्करपणेच झालं आहे ते

श्री.नितीन लढढा :- अंतीम टप्प्यात त्या निविदा आलेले असतांना

श्री.कैलास सोनवणे :- एक काम करा. पहिले ठेका फाईनल करा नंतर बदली करा .

श्री.नितीन लढढा :- नाही नाही नाही, मी ते नाही म्हणत आहे.

श्री.अनंत जोशी :- अप्पा साहेब तुम्ही स्वत: सभागृहामध्ये उदय पाटीलांचे कामाचे कौतुक केलेले आहे आणि तुम्ही सुध्दा स्वत: सही केलेली आहे आणि जे ठराव त्याच्यावर पण सही केलेली आहे.

श्री.कैलास सोनवणे :- सन्मा.सदस्य अनंत जोशी जे बोलेले आहेत या ठिकाणी की तुम्ही स्वत: सही केलेली आहे तर गटनेत्यांची सही खाली आहे चौथ्या नंबरवर. एक नंबरवर माझी सही आहे आणि गटनेत्यांचा आदेश होता मला की सही करा. गटनेत्यांचे आदेशाचा पालन करावे लागते.

श्री.नितीन लढढा:- मा.उपमहापौर साहेब त्याठिकाणी आपण स्वत: त्या ठेक्याची पारदर्शकता जोपासत असाल. पण परंतु ज्या पध्दतीने चर्चा होतात. किंवा महानगरपालिकेच्या वर्तुळात किंवा सामान्य नागरीकांमध्ये की कुठेतरी काही अपात्र असणाऱ्या मक्तेदारांना पात्र करण्याच्या दृष्टीकोणातुन आरोग्याधिकाऱ्यांची कुठली तरी भुमिका टोकाची असल्याकारणाने त्यांची ताबडतोब उचलबांगडी करण्यात येत आहे. अशी परिस्थिती आहे परंतु त्या गोष्टीत तथ्य असेल किंवा नसेल हा भाग वेगळा आहे. परंतु अशा पध्दतीचे शितोडे उडणे आणि एखाद्या अधिकाऱ्याची चौकशी प्रलंबित असतांना त्याला त्याच पदावरती नेमणुक करण्याचा हा त्या संशयाला बळकटी देत असतो.

श्री. कैलास सोनवणे :- ठिक आहे ना. मक्त्याचा तो सर्व विषय पुर्ण करुन घ्या. त्यानंतर द्या तुम्हाला संशयच येणार नाही घ्यायला.

श्री.नितीन लढढा :- डॉ.विकास पाटलांना तुम्ही आज घेऊन घ्या.

श्री.अनंत जोशी :- पण चौकशी झाली पाहिजे ना.

श्री.कैलास सोनवणे :- चौकशी चालु आहे ना त्यांची. चौकशीत जे निष्पन्न निघेल ते निघेल तो आपला विषय आहे का ? चौकशी करणं.

श्री.नितीन लढढा :- विकास पाटीलांना आज द्यायचं असेल तर आज द्या परंतु चौकशीची परिस्थिती काय ?

श्री.सुनिल महाजन :- चौकशीचा खुलासा द्या. राजु पाटील साहेब इकडे या.

श्री.कैलास सोनवणे :- मी तर म्हणतो आहे ना. चौकशीचे करता काय ?

श्री.राजेंद्र पाटील, आस्थापना अधिक्षक :- ठराव झाल्यापासुन विकास पाटील यांना ज्ञापन किंवा चौकशीचा कुठलाही आदेश देण्यात आलेला नाही.

श्री.कैलास सोनवणे :- याला जबाबदार कोण ?

श्री.राजेंद्र पाटील, आस्थापना अधिक्षक :- त्या त्या काळातील ते ते अधिकारी.

श्री.कैलास सोनवणे :- हे बघा. आपणच ठराव करायचा. सन्मा.नगरसेवक आले की अनंत जोशींनी त्यांचे पाय पडायचे. आणि पुढे काहीच करायचे नाही.

श्री.सुनिल खडके :- हे तुमच्या काळात झाले. ही तर तुमची जबाबदारी होती. मग तुमच्या काळात हे करुन घेणेपण तुमच काम होत.

श्री.नितीन लढढा :- ही प्रशासकीय बाब आहे अप्पा. हया संपुर्ण प्रशासकीय बाबी आहेत.

श्री.कैलास सोनवणे :- चर्चा सुरु करुन लवकर संपवा. नाही तर चालु द्या दुसऱ्या दिवसापर्यंत.

श्री.अश्विन सोनवणे, उपमहापौर:- आहो बंटी भाऊ जोशी, ऐकु येत नाही का ? आहो अनंत जोशी खाली बसा.

श्री.अनंत जोशी :- काही लोकांचे आर्थिक संबंध जोपासण्यासाठी आर्थिक हित संबंध जोपासण्यासाठी हे प्रयत्न आहेत. ही जी प्रक्रिया इतक्या घाईगडबडीने व तातडीने सुरु आहे या प्रमाणे ७५ कोटीचा ठेका देण्यासाठी आपल्या मर्जीच्या ठेकेदाराला ठेका देण्यासाठी आपण हे प्रयत्न करत आहात.

श्री.कैलास सोनवणे :- आमचा स्वत: या गोष्टीला विरोध होता हे तुम्हाला माहिती आहे की नाही. ? आमचा विरोध होता या गोष्टीला आणि एकमुक्त च्या ठेक्याला सुध्दा विरोध होता.

श्री.अनंत जोशी :- विकास पाटीलांची चौकशी करुन अहवाल सादर झाल्यानंतरच त्यांची नियुक्ती केली जाईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, डॉ.श्री.विकास पाटील, आरोग्य अधिकारी व हल्ली जन्म-मृत्यु निबंधक यांनी आरोग्य अधिकारी या पदाची शैक्षणीक पात्रता धारण केलेली असल्याने त्यांची चौकशीच्या अधिन राहून आरोग्य अधिकारी या पदावर पदस्थापना करणेस व सध्या आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री.उदय मधुकर पाटील, शाखा अभियंता यांची इतर पदावर पदस्थापना करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने वरीलप्रमाणे पदस्थापनेचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ४८ प्रतिकुल मते :- १२**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

नगरसचिव विषय क्र.२१) जळगांव शहर महानगरपालिका हद्दीसाठी लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार बाल्कनी अनुज्ञेय असुन बंदीस्त बाल्कनी नियमानुकुल करणे संदर्भात प्रिमियम आकारणीचा दर निश्चित करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीसाठी लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार बाल्कनी अनुज्ञेय आहे. प्रिमीयम रक्कम आकारुन बंदीस्त बाल्कनी नियमानुकुल करण्याच्या जळगांव महानगरपालिकेच्या प्रस्तावास शासनाचे नगर विकास विभागाने निर्णयस क्र.टीपीएस/३५९९/५१७/सी.आर/१९३/२००२/युडी-९, दि.१९/०१/२००३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने जळगाव महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.२० दि.२०/०७/२०१४ अन्वये ठराव पारित करुन बाल्कनी बंदीस्त केल्यास त्यासाठी खालील प्रमाणे प्रिमीयम आकारणीचा दर निश्चित केलेला आहे.

१) पहिले पाच चौ.मी. क्षेत्रासाठी रु.५००/-

२) त्यापुढील अतिरीक्त बंदीस्त दोन चौ.मी.क्षेत्रासाठी रु.२५०/-

वरील प्रमाणे बाल्कनी बंदीस्त करण्यासाठीचे प्रिमीयमचे दर आज पर्यंत लागु केले जात आहेत.

सन २०१२ मध्ये जळगांव महानगरपालिका हद्दीसाठी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली मंजुर करण्यात आली सदर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१६.५.क नुसार बाल्कनी बंदीस्त करण्याची तरतुद होती. तथापी सन २०१६ मध्ये जळगांव म.न.पा.साठी ड वर्ग महानगरपालिकांसाठी लागु असलेली विकास नियंत्रण नियमावली दि.२०/०९/२०१६ पासुन लागु झालेली आहे. सदर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.४१.१४.IV मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

The Balcony should not be enclosed and declaration regarding this shall be submittd by the owners developers / Architect at the time of Approval of building permission and the same shall be mention in the agreement or sale deed.

सन २०१२ मध्ये लागु झालेल्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे मंजुर झालेल्या बांधकामातील बाल्कनी बंदीस्त असल्यास त्या प्रिमीयम घेऊन अनुज्ञेय करता येतील मा९ सन २०१६ मध्ये लागु झालेल्या 'ड' वर्ग महानगरपालिकांना लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावली अन्वये मंजुर झालेल्या बांधकाम नकाशा मधील बाल्कनी बंदीस्त करण्यास मान्यता देता येणार नाही. सन २०१२ मध्ये लागु झालेल्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे मंजुर झालेल्या बाल्कनी बंदीस्त करण्यासाठी सन २००४ मध्ये महासभेने मंजुर केलेल्या दरानुसार आकारणी करणे संयुक्तीक वाटत नाही.

सुधारीत बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी नुसार प्रिमीयम चे दर बाजार मुल्य दराच्या १० टक्के एवढे आहेत.

वरील परिस्थितीत सन २०१६ मध्ये लागु झालेल्या विकास नियंत्रण नियमावली पुर्वी मंजुर झालेल्या बांधकाम नकाशातील बंदीस्त बाल्कनी साठी बाजार मुल्य दराच्या (शिघ्रसिध्दगण) १० टक्के प्रिमीयम किंवा कमीत कमी रु.१०००/- प्रती चौ.मी.आकारणे योग्य राहील.

मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.४१.५ (२) अन्वये कपाटे (Cupboard) हे ०.६० मीटर प्रोजेक्शन व २.४० मीटर रुंदी अनुज्ञेय आहे. या प्रमाणे कपाटाचे बांधकाम अनुज्ञेय केले असले तरी काही खाजगी मालक / विकासक या कपाटांची रुंदी स्लॅब लेव्हल पर्यंत घेऊन बांधकाम करतात. त्यामुळे या कपाटांचे क्षेत्र रुम मध्ये समाविष्ट होते. अशा रुम मध्ये समाविष्ट झालेल्या क्षेत्रासाठी बाजारमुल्य दराच्या १० टक्के प्रिमीयम किंवा कमीत कमी रु.१०००/- प्रती चौ.मी. आकारुन कपाटाचे क्षेत्र नियमीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- बेंडाळे उज्वला मोहन**

नगरसचिव विषय क्र.२२) मनपा हद्दीतील महिला बचतगट विकासासाठी शहरात मध्यवर्ती ठिकाणी शनिवार / रविवार रोजी मध्यवर्ती बाजार पेठ उपलब्ध करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- जागा रिक्त पाहिजे.

श्री.कैलास सोनवणे :- एक बालगंधर्वाची जागा आहे एक रेडक्रॉस जवळची जागा आहे. शनिवार रविवार दोन दिवस आहे. तिथे जागा आहे भंगार बाजार जवळ.

श्री.नितीन लढढा :- द्या द्या जागा. पण शनिवार रविवार दोनच दिवस त्या जागेचा वापर व्हायला पाहिजे नाही तर ते काय होत ते Continuation मध्ये येऊन जातं.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेत बऱ्याचसा परिसर हा गोरगरीब वस्तीचा परिसर असुन त्या परिसरातील महिलांचे सबलीकरण करणेच्या दृष्टीने त्यांचे बचत गटामार्फत विविध उपक्रम हाती घेवुन त्याव्दारे गटातर्फे संसारपयोगी वस्तु बनविणे, विविध पाककलेव्दारे खादयपदार्थ तयार करणे अशी कामे करुन त्यांचे अनेक महोत्सवाव्दारे, कार्यक्रमाव्दारे प्रदर्शन व विक्री करण्यात येत असते.

मात्र जळगांव शहरात अनेक होतकरु महिलांचे बचत गट स्थापिक असुन ते उपरोक्त नमुद विविध कार्याव्दारे आपले उदरनिर्वाह करीत आहेत. अश्या महिला बचत गटांव्दारे निर्मित वस्तु व पदार्थांना त्यांचे हक्काचे बाजारपेठ उपलब्ध झाल्यास त्यांच्या विकासात भर पडून जळगांव शहरातील महिलांचे सबलीकरणाचे धोरण पुर्णत्वास येवु शकते.

करीता उपरोक्त नमुद कारणास्त शहरातील महिला बचत गटांव्दारे निर्मित साहित्य, वस्तु, पदार्थ यांचे शहरात शनिवार व रविवार रोजी मध्यवर्ती ठिकाणी बाजार पेठ भरविणेसाठी प्रशासनाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमानुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.२३) मनपा विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी व कामगार कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत सन्मा.सदस्य श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या जवळ जवळ सर्वच विभागात कर्मचारी / अधिकारी यांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. दवाखाने विभागासारख्या अत्यावश्यक विभागात सुध्दा ही स्थिती आहे. त्यामुळे रुग्णांवरील अत्यावश्यक उपचार इत्यादीत अडचणी उद्भवण्याची स्थिती समोर आली आहे.

महापालिकेच्या विविध विभागात पूर्वी कार्यरत कर्मचारी आता सेवा निवृत्त झाल्याने अनेक जागा रिक्त आहेत. नवीन भरती प्रक्रिया झालेली नाही. तसेच बऱ्याच वर्षापासुन अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. मनुष्यबळाच्या अभावामुळे अत्यावश्यक सेवा पार पाडणेही जिकरीचे होत असल्याची स्थिती आहे. या स्थितीतून मार्ग काढण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे याबाबत आस्थापना विभागाने विभाग निहाय व पदनिहाय आढावा घेऊन ज्या ठिकाणी अधिकारी / कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांची शासन निर्णय / शासन परिपत्रकानुसार तात्काळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन / कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व तात्काळ भरती प्रक्रिया सुरु करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- नेरकर सरिता अनंत**

नगरसचिव विषय क्र.२४) वार्ड क्र.११ मधील ओपन स्पेसमध्ये जॉगींग ट्रॅक गार्डन करणे व इतर कामांबाबत सन्मा.सदस्या सौ.उषाताई संतोष पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, वा.क्र.११ मधील पिंप्राळा शिवार गट क्र.१५२/२/३, १५२/१ या दोन्ही महानगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये जॉगींग ट्रॅक, खेळणी बसविणे व गार्डन करणे तसेच कंपौऊड वॉल बांधणे व पिंप्राळा शिवार गट क्र.१२३/२ व ३ ओपन स्पेसमध्ये स्मशानभुमी बांधकाम करणे उक्त कामी वारंवार परिसरातील नागरीकांची मागणी होत असुन सदर महानगरपालिका खुल्या जागेवर मोठया प्रमाणावर अतिक्रमण होत असल्यामुळे नागरीकांना सदर जागेचा उपयोग करता येत नसल्यामुळे उक्त नमुद जागेवरील अतिक्रमण नगररचना विभागाकडुन तात्काळ कार्यवाही करुन काढुन सदर ओपन स्पेसमध्ये जॉगींग ट्रॅक, खेळणी बसविणे व गार्डन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- भिल पार्वताबाई दामु**

**अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक**

नगरसचिव विषय क्र.२५) एम.जे. कॉलेज ते कलेक्टर बंगल्याकडे जाणाऱ्या गिरणा टाकीच्या वळणावरील चौकास विठ्ठल मंदिर चौक असे नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्या सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्या सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार व वार्ड क्र.२२ मधील नागरीकांच्या मागणीचे अनुषंगाने समर्थ कॉलनी, रामदास कॉलनी, गुरुदत्त कॉलनीच्या व एम.जे. कॉलेजला लागुन असलेल्या "चौकास विठ्ठल मंदीर चौक" असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त चौकास यापुर्वी कोणाचे नांव दिले गेले नसलेबाबत खात्री करुन सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- राणे गायत्री इंद्रजित**
**अनुमोदक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

नगरसचिव विषय क्र.२६) १४ व्या वित्त आयोगामधुन मेहरुण स्मशानभुमीचे सुशोभिकरण करणेबाबत सन्मा.सदस्या श्रीमती रेखा चुडामण पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्रीमती.रेखा पाटील :- मेहरूण भागामधील स्मशानभुमी सुशोभीकरण करणे आणि दुसरा प्रभाग क्रंमांक शिरसोली रोडवरील जीवनमोती सोसायटी जवळील कब्रस्थान सुशोभीकरण करणे अशी मी विनंती करते

श्री.नितीन लढढा :- मा.महापौर ताई मी या सभागृहात याविषयी मेहरूण स्मशानभुमी संदर्भात जैन उदयोग समुहाचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांच्याशी यापुर्वीही आमची चर्चा झालेली होती .त्याअनुषगांने मध्यंतरी विकास आराखडे सुध्दा केलेले आहे तसेच तेथे पार्कींग व्यवस्था देखील व्हावी या अनुषगांने मोठया भागामध्ये भराव टाकुन पार्कींगची व्यवस्थासुध्दा त्याठिकाणी त्यांनी केलेली आहे .

श्रीमती.रेखा पाटील :- नाही आणि तेथे वॉल कंपाऊंड पण व्हायला पाहीजे.

श्री.नितीन लढढा :- त्याठिकाणी मी आणि विष्णू भाऊ बळीराम पेठेतील गणेश मंदिर त्याचा जिर्णोध्दारासाठी मा.अशोक भाऊंच्या माध्यमातून व्हाव अशी विनंती करायला गेलो असतांना मी त्यांना पुनश्च त्या विषयाची आठवण करून दिली आणि त्यांनी सांगीतल की मेहरूण ची जी स्मशानभुमी आहे त्यांचे सर्व विकास आराखडे त्यांचे तयार आहेत आणि साधारणत: एप्रिल महिन्यात त्या स्मशानभूमीच काम ते सुरू करणार आहेत .लोकसहभागाच्या पध्दतीने अशा प्रकारचे काम होत असतील तर महानगरपालिकेचे जे लाखो रू आहेत ते तरी कमीत कमी वाचतील काम चांगल्या प्रकारच होईल कब्रस्तानचा विषय असेल तर निश्चित पणे तो मान्य करायला हरकत नाही मेहरूण स्मशानभूमी चा विषय असेल शामाप्रसाद मुखर्जी उदयानासंदर्भातला विषय त्याचातला काव्य रत्नावली चौकातला एस.पी बंगल्याच्या बाजुचा ज्या झोनाचा विषय आहे या संपुर्ण विषयासंदर्भातला जो विषय आहे यासर्व विषयांच्या आठवणी आम्ही करून दिल्या आहेत आणि त्यांनी त्या मान्य केल्या व एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये या संपुर्ण कामाला सुरूवात करण्यात येईल आणि लोकसहभागातुन महानगरपालिकेचा पैसाही वाचेल आणि त्या पदधतीने ते विकास साध्द करतील तो निश्चत पणे आपल्या महानगरपालिकेपेक्षा चांगल्या पदधतीने साध्य करतील .

श्री. राजेंद्र पाटील :- महानगरपालिकेला जे १०० कोटी मिळालेले आहे. सदोतीस लाख रू मंजूर करून दिलेले आहेत मेहरूण स्मशानभूमी करीता

श्री.नितीन लढढा:- एकीकडे आपण महानगरपालिकेची विकट आर्थिक परिस्थितीने झुझतो आहे आणि तश्या परिस्थितीमध्ये महानगरपालिकेला जर कोणी विकास करुन देत असेल तर तो साध्य करायला मला वाटतं काही अडचण नसावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण स्मशानभुमी मध्ये आज अत्यंत दैनिय परिस्थिती असुन त्या ठिकाणी कंपाऊंड वॉल, गेट, पेव्हर ब्लॉक, लाईट व्यवस्था, तसेच बैठक व्यवस्था अशा कामांची अत्यावश्यकता आहे. किमान अत्यंविधीसाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी वरील सर्व बाबींची पुर्तता करणेस तसेच १४ व्या वित्त आयोगामधुन मेहरुण स्मशानभुमीचे सुशोभिकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

नगरसचिव विषय क्र.२७) म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेल्या दि.१४/११/२०१७ च्या आदेशाविरुध्द न्याय मिळणेसाठी श्री.जितेंद्र सुकदेवराव यादव, बडतर्फ क.अभियंता यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

श्री.नवनाथ दारकुंडे :- जसे मागच्या महासभेत विषय आलेले आहे तश्याच प्रकारे सर्व कर्मचाऱ्यांना हा विषय लागु करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.जितेंद्र सुकदेवराव यादव यांना आदेश क्र./२२२९ दि.१४/११/२०१७ अन्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आले असुन सदरचे बडतर्फ आदेशा विरुध्द न्याय मिळणेबाबत श्री.जितेंद्र यादव यांनी विनंती अर्ज केलेला आहे.

श्री.जितेंद्र यादव यांचे अर्जात नमूद केलेनूसार त्यांना १) आदेश क्र./आस्था/३३१ दि.२२/०४/१९९७, २) आदेश क्र./आस्था/५४५६ दि.०९/१०/२०००, ३) कारणे दाखवा नोटीस क्रं./५०७८ दि.१०/०३/२००६, ४) आदेश क्र./आस्था/६०३ दि.०३/०६/२०११, ५) निलंबन आदेश क्र./आस्था/१५७६ दि.१९/०९/२०१७ चे आदेशानुसार त्यांचेवर झालेल्या कारवाई बाबत त्यांनी उपरोक्त सर्व आदेशा चे खुलासा सादर केलेला असुन उक्त प्रकरणांमध्ये झालेल्या विभागीय चौकशीमध्ये निर्दोष मुक्तता केलेली असल्यावरही श्री.जितेंद्र यादव यांना आदेश क्र./२२२९ दि.१४/११/२०१७ अन्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

करीता श्री.जितेंद्र यादव यांचे विरुध्द उपरोक्त १ ते ५ आदेशानुसार झालेल्या कारवाई बाबत त्यांनी सर्व आदेशांचा खुलासा सादर केलेला असुन उक्त प्रकरणांमध्ये झालेल्या विभागीय चौकशीमध्ये त्यांची निर्दोष मुक्तता केलेली असल्याने व या प्रकरणात त्यांचेवर कोणतेही आरोप सिध्द झालेले नसल्याने तसेच त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याने श्री.जितेंद्र सुकदेवराव यादव, क.अभियंता यांना मनपा सेवेत रुजू करणेस घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

नगरसचिव विषय क्र.२८) श्रीमती सुरैय्या हबीब पटेल, अध्यक्ष सुरैय्या हबीब पटेल बहुउद्देशिय महिला मंडळास ज.श.म.न.पा.ची गट नं. ६९-७० ची जागा समाज सेवा करण्यास मिळणेबाबत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्रीमती सुरैय्या हबीब पटेल, अध्यक्ष सुरैय्या हबीब पटेल बहुउद्देशिय महिला मंडळ व त्या परिसरातील नागरीकांनी केल्याप्रमाणे शिवाजी नगर गेंदालाल मिल कॉलनी येथील गट क्र.६९-७० येथे रिकामी असलेली जागा महानगरपालिकेच्या सर्व अटी - शर्तीस अधिन राहुन सुरैय्या हबीब पटेल बहुउद्देशिय महिला मंडळास देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६० प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- नेरकर सरिता अनंत**

**अनुमोदक :- खान रुकसाना गबलु**

नगरसचिव विषय क्र.२९) जुने जळगांव बहुउद्देशिय मित्र मंडळ, जळगांव यांना क्रिडांगणाच्या प्रयोजनासाठी गट क्र.व उपविभाग ७५/१/२/खुली/जागा (क्षेत्र-आर.चौ.मी.२२.०१.००) आणि ७७/५/६/खुली/जागा (क्षेत्र- आर.चौ.मी.१४.८३.६८) असलेला खुला भुखंड मिळणेबाबत अध्यक्ष, जुने जळगांव बहुउद्देशिय मित्र मंडळ, जळगांव यांचे आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.१४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जुने जळगांव बहुउद्देशिय मित्र मंडळ, जळगांव ही संस्था सन २००४ पासुन जळगांव शहरात कार्यरत असुन संस्थेकडुन विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. तसेच शहरातील विविध भागातील लोकांना यात सहभाग नोंदवुन उपक्रम ही आखले आहेत.

त्यासाठी क्रिडांगणाच्या प्रयोजनासाठी म.न.पा. खुली जागा गट क्र.व उपविभाग ७५/१#२ खुली जागा (क्षेत्र-आर.चौ.मी.२२.०१.००) आणि ७७/५#६ खुली जागा (क्षेत्र-आर.चौ.मी.१४.८३.६८) असलेला खुला भुखंड मिळणेबाबत जुने जळगांव बहुउद्देशिय मित्र मंडळ, जळगांव यांनी केलेल्या मागणीनुसार गट क्र.व उपविभाग ७५/१#२ (क्षेत्र-आर.चौ.मी.२२.०१.००) खुली जागा, आणि ७७/५#६ (क्षेत्र-आर.चौ.मी.१४.८३.६८) खुली जागा जुने जळगांव बहुउद्देशिय मित्र मंडळ, जळगांव यांना म.न.पा.चे अटी - शर्तीस अधिन राहुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६०       प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- खडके सुनिल वामनराव**
**अनुमोदक :- खडके विश्वनाथ सुरेश**

सौ.शुचिता हाडा :- मला एक माहिती सांगायची होती. या सगळे आरोग्याचे विषयावर आरोप प्रत्यारोप झाले.मला वाटतं आचार संहिता लवकरच लागु होते आहे माझ्या माहिती प्रमाणे टेंडरसाठी ऑनलाईनच प्रोसिजर आहेत. लिफाफा १ सुध्दा ओपन झालेला आहे. त्याची स्क्रुटीनी ही अजुन सुरु आहे. स्क्रुटीनी ती आजच्या आज करावी. आणि लगेच लिफाफा नंबर २ ओपन करुन जे लोएस्ट रेट आहेत त्यांना वर्क ऑर्डर द्यावी. या सर्व प्रोसेसिंग मध्ये आरोप प्रत्यारोप होत आहे आणि यात प्रशासन पारदर्शकपणे काम करीत आहे. माझा काही आरोप नाही. पण हे सगळं लवकरात लवकर व्हावं आणि हे सांगण्याचा उद्देश एकच आहे की आचार संहिता लागण्यापुर्वी जर ही सगळी प्रोसिजर झाली तर जळगांवातला साफसफाईचा जो संवेदनशिल विषय आहे आणि सगळेच नगरसेवकांना या विषयाचा त्रास होत आहे. तर तो विषय कायम स्वरुपी मार्गी लागेल.अशी ही सुचना वजा विनंती आहे.

सौ.मंगला चौधरी :- ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन असल्याने दि.०६ मार्च ते ०८ मार्च २०१९ पावेतो विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी मी सर्व सभागृहाला विनंती करते की, सर्वांनी कार्यक्रमाला उपस्थित राहवे व मा.आयुक्त साहेब यांनी कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन दिला त्या बद्दल त्यांचे ही विशेष आभार.

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**
**(भोळे सिमा सुरेश)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**